साहामाही ........ ८
साल अखेर " ......स...... १ ०८
किरकोळ अंकास..................०४

नोटिशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०।०६
दुसरे खेपेस-..........०१

Six monthly............3 " 8 as.
Single copy.................................4 as.

Advertisements.
Below 10 lines...2 Rs
Per line over 10...4as
Repetition perline...3

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOLXXII AKOLA MONDAY 2 JULY 1888 NO.26

वर्ष२२ अकोला सोमवार तारीख २ माहे जुलै सन १८८८ इ० अंक २६

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

साष्टांग नमस्कार वि. वि. आपल्या सुंदरपत्रीं खालीं लिहिलेल्या चार ओळीस जागा मिळेल अशी आशा धरून आपले सेवेशीं पाठविल्या आहेत, तर कृपा करून याचा स्विकार व्हावा हीच विनंती आहे.

आमचे येथील परम लोकप्रिय महमदसल्लामुल्लाखान नबाब साहेब जाहगीरदार याना ही सरकारांतून "खानबहादूर" ही पदवी मिळाली त्या निमित्य आनंद प्रदर्शित करण्या करितां देऊळघाट येथील सर्व लोकांनीं ता. १६–६–८८ इ० रोजीं हिंदुस्थानी शाळेंत सभा भरवून नबाबसाहेबांस पानसुपारी केली. सभेची व्यवस्था नथु शेट, लक्ष्मणराव डागे, लाडखा फारेखर आणि शिवप्रसाद पांडेजी यांनीं फारच उत्तम प्रकारची [illegible]होती. सभा भरण्याचा उद्देश नबाब [illegible]चें लोकप्रिय व न्यायीपणाचें वर्तन या संबधानें थोडक्यांत आणि सुरस असें भाषण येथील हेडमास्तर नारायण लक्ष्मण जोग यांनीं केलें; तसेंच मिडल स्कूलचे हेडमास्तर नजर महंमदखा यांनीं व फर्स्ट असिस्टंट मास्तर अमृत पांडुरंग यांनीं स्वकृत कविता चार चार पांच पांच केल्या आणि त्या मुलांकडून ह्मणविण्यास लाविल्या; त्या ऐकून नबाब साहेब व सर्वत्र मंडळी फारच खुष झाली.

सर्वांनुमतें लिहिलेलें मानपत्र साहेब बहादूरांस वाचून देण्यांत आलें नंतर गांवकरी सर्व लोकांनीं आपला आनंद दाखवून मानपत्र दिल्याबद्दल नबाब स[illegible]नीं फारच मनोवेधक आणि आभार सूचक असें सुरस भाषण केलें, शेवटीं, अत्तर, हारगजरे व पानसुपारी होऊन सभा विसर्जन झाली, कळावें लोभ असवा हे विन[illegible].

आपला
अपरिचित "क्ष"

वऱ्हाडसमाचार.

मिती ज्येष्ठ वद्य ९ शके १८१०.

आमच्या कडे 'आर्यन लिफलेट' या नांवाचें एक पुस्तक आलें आहे त्याचा आम्हो फार आनंदानें स्वीकार करितों. ग्रंथ कर्त्याचा हेतु फार उत्तम आहे ह्मणजे असल्या प्रकारचीं लहान पुस्तकें छापून आपले देशबांधवांस आपले देशाचे सुधारणे संबंधीं शिक्षण देण्याचा आहे. राष्ट्रीय सभेचाही हा हेतु आहेच व असल्या प्रकारचीं लहान लहान पुस्तकें अनेक विषयांवर जितकीं होतील तितकीं आह्मास पाहिजे आहेत. ग्रंथ कर्त्यानें हें पुस्तक फुकट वाटलें आहे हें त्यास फारच भूषण आहे. अशी छोटेखानी पुस्तकें करणारांस आमची एवढी सूचना आहे कीं त्यांमीं होतां होईल तोंपर्यंत अगदीं सोपे शब्द या लहान पुस्तकांतून घालावेत. कारण सर्व लोकांस वास्तविक उपयोग व्हावा व त्यांस समजावें असें वाटत असल्यास सोपी भाषा लिहिली पाहिजे. हल्लीं 'मौलवी फरीदुद्दीन व रामबक्ष यांचा संवाद' ह्मणून मराठींत भाषांतर झालेलें पुस्तकांतही हा दोष आहे हा दोष पुढील अतीं लहान पुस्तकें लिहिणारे काढून टाकतील अशी आह्मी आशा करतों.

## दिवाणी न्याय-खातें.

( सन १८८७ सालाबद्दल )

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

वऱ्हाडांतील दिवाणी कोडतांतून एकंदरींत २,३६,९७९ रुपये १२ आणे ७ पै रकमेबद्दल हुकूमनामे झाले त्या पैकीं १३१७९ रु० ७ आणे ११ पै कोर्टाच्या फैसल्या बरोबर जमा झाले आणि २,२३,८०० रु० ४ आणे ८ पै जप्ती सारख्या अमलबारीनें वसूल करावे लागले. धनकोच्या पैशाची फेड होत नसल्यामुळें दिवाणीकैद भोगणारे २१७ असामी निघाले त्यापैकीं रिपोर्टाच्या साल अखेर १९९ ऋणको बंधमुक्त झाले. ह्या वर्षीं कोडताकडे नादारीचें सरटीफिकेट द्यावें, ह्मणून एकूण १२ अर्ज झाले त्या पैकीं १२ असामी मात्र नादार ठरले आहेत. नादारीचा कायदा निर्धन मनुष्याच्या सोयीसाठीं सरकारनें केला आहे तरी त्याचा अयोग्य रीतीनें उपयोग करून घेण्याचा लोकांचा बिलकुल कल नाहीं ही गोष्ट विशेष आनंद मानण्या सारखी आहे.

साक्षीदार लोकांस तीन किंवा तिहीहून जास्त दिवस राहणें भाग पडूं नये ह्मणून असावी तशी अद्याप व्यवस्था झाली नाहीं. साक्षीदार लोक एकंदर ४४३७१ होते. त्या पैकीं १०२९ गृहस्थांस तीन किंवा तीन दिवसांपेक्षां जास्त दिवस रहावें लागलें अकोला स्मालकाज कोडतांत साक्षीदार लोकांस जास्त दिवस राहण्यास लागतें याचें कारण दाखवितांनां कोर्टाच्या जज्ज साहेबांनीं स्वतांचा बचाव करण्याचा वाट मोठ्या खुबीनें घातला आहे. ते ह्मणतात कीं साक्षीदारांची संख्या वाढत चालली त्या मानानें त्यास जास्त दिवस राहावें लागते असे आणि त्यामुळें माजी नज्जास वेळ न मिळाल्यामुळें दावे अनेक वेळीं लांबणीवर टाकणें भाग पडे. साक्षीदारांस जास्त दिवस राहवें लागतें तेव्हां त्यांस त्या दिवसांबद्दल पक्षकाराकडून भत्ता मिळावा तो मिळतो किंवा नाहीं अशाबद्दल जुडिशिअल कमिशनरांस गूढ पडलें आहे त्याचा निर्णय ते थोडक्यांत करितील तर बरें होईल.

ह्या वर्षांत डे कमि. कडे एकंदर ९७८ अपिलें झालीं असून त्या पैकीं शकडा ३६ अपिलें रद्द झालीं आहेत यावरून अफिशिएटिंग जुडिशिअल कमिशनरांनीं एक वीरण बांधलें आहे कीं खालील कोर्टांत न्याय कायदेशीर दिला जातो ह्मणून अपिलें रद्द होतात. पण असें अनुमान करिते वेळीं त्यांनीं रद्द झालेली अपिलें योग्य रीतीनें काढून टाकिलीं आहेत किंवा नाहीं याचा पूर्वीं तपास केला पाहिजे होता. हा तपास खरोखर होत नसेल तर ही मोठी नजरचूक साहेबांच्या हातून होत आहे असें दिसतें. या बद्दल पुढील रिपोर्टाच्या वेळीं खबरदारी घेतली जाईल अशी आशा आहे. खुद्द जुडिशियल कमिशनरांच्या कोडतांत ३९१ अपिलें झालीं असून त्यां पैकीं १६३ अपिलांचा निकाल लागला. सन १८८६ अखेर ९१ अपिलें शिल्लक होतीं तीं या साल अखेर ९६० पर्यंत वाढलीं आहेत आणि या मानानें प्रत्यक अपिलास १९९-६ दिवस लागले. प्रत्येक अपिलास सरासरा सहा सात महिने लागूं लागले ह्मणजे पक्षकार लोक अपिलें करण्यास कंटाळतात आणि त्या मुळें रयतेस मिळावा तसा न्याय मिळत नाहीं. दिवाणी खात्यांत वर निर्दिष्ट केलेल्या सुधारणा होण्यास दिरंगाई न होतां अनेक महत्वाचे फेरफार होत जाऊन त्या मानानें त्या खात्याचा लोकांस जास्त जास्त उपयोग होईल अशी तजवीज होण्या साठीं अलिशान रेसिडेंट साहेब मनापासून झटतील अशी आम्ही उमेद बाळगितों.

( मागील अंकावरून पुढें चालूं. )

२२. नियम ८ (९!) यांत सांगितलेलीं तीन वर्षें ज्या सालीं निवड केली गेली असेल त्या सालचे एप्रिल महिन्याचे १ ले तारखे पासून मोजलीं जातील. मध्यंतरी ज्या जागा खालीं होतील त्या ज्या मेंबराची जागा खालीं झाली असेल तो निवडलेला असेल किंवा नेमलेला असेल त्याप्रमाणें निवडणुकीनें किंवा नेमणुकीनें भरल्या जातील. जर एखादे निवडलेले मेंबरानें कामाचा राजीनामा दिला असेल तर तो जितका काळ पर्यंत बोर्डांत राहिला असता तितक्या काळा पुरतीच त्याची जागा भरली जाईल.

२३. डिस्ट्रिक्ट बोरडास रेसिडेंट साहेब फर्मावतील तितके मेंबरांची संख्या राहील, परंतु प्रायः २४ मेंबरांपेक्षां कमी रहाणार नाहीं.

कमिशनर ६ मेंबर नेमतील त्यांची योजणूक प्रायः परंतु जरूरीनें नव्हे दिपुटी कमिशनर करतील, बाकीचे मेंबर तालुक बोर्डचा मेंबरा पैकीं रहातील. त्यांची निवड तालुक बोर्डानें करावी.

हे जिल्हा बोरडांत असणारे तालुक बोरडांतील सभासद मुद्दाम त्याच कामाकरितां भरविलेल्या तालुक बोरडाच्या सभेंत वेळोवेळीं निवडले जातील.

२४. प्रत्येक जिल्हा बोरडाचे मेंबरांची पूर्ण यादी त्यांचे नेमणुकी नंतर होईल तितके लवकर दिपुटी कमिशनर यांणीं कमिशनर यांजकडे हैदराबाद रेसिडेंसी आर्डर्समध्यें छापली जाण्याकरितां पाठवावी व त्यांचे कामाचे मुदतीस असे प्रकारचे प्रसिद्धीचे तारखे पासून सुरुवात होईल.

जिल्हा बोरड व तालुके बोरडचीं कामें

२५. जिल्हा बोरडानें वर्षांतून सहा वेळां पेक्षां कमी नव्हे इतके वेळां सभा भरवावी व दोन लागोपाठ भरलेल्या सभेच्या दरम्यान दोन महिन्या पेक्षां जास्त काळ जाऊं देऊं नये.

२६. प्रत्येक तालुक बोरडानें वर्षांतून १२ वेळां पेक्षां कमी नव्हे इतके वेळां सभा भरवावी व दोन लागोपाठ भरलेल्या सभेच्या दरम्यान पावसाळा खेरीज करून एक महिन्या पेक्षां जास्त काळ जाऊं देऊं नये. पावसाळ्यांत दोन महिन्या पेक्षां जास्त काळ जाऊं देऊं नये.

२७. जि. बोरड किं तालुक बोरडची प्रत्येक सभा विसर्जन होण्यापूर्वीं पुढील साधारण सभेची तारीख मुकरर केली जावी. परंतु चेअरमन यांणीं दिपुटी कमिशनरचे मंजुरातीनें कोणतेही वेळीं तसें करण्यास योग्य कारण उत्पन्न झाल्यास विशेष सभा भरावी.

२८. काम करण्या करितां जिल्हा किंवा तालुक बोरडचे मेंबरां पैकीं $\frac{1}{4}$ कोरम समजले जातील. परंतु हजर असलेले मेंबरा पैकीं निमेहून कमी नाहीं इतके निवडलेले मेंबर असले पाहिजेत.

२९. जर जिल्हा बोरड किंवा तालुक बोरडाचा एखादा मेंबर लागोपाठ तीन सभेस गैर हजर राहील तर त्याबद्दलचा रिपोर्ट दिपुटी कमिशनर कडे करावा. व त्यांनीं योग्य दिसल्यास अशा मेंबरानें राजीनामा दिला असें ठरवून त्याचे राहिलेले मुदती करितां दुसरा इसम निवडला जाण्या विषयीं तजवीज करावी.

३०. जिल्हा बोरड किंवा तालुक बोरड-

चे प्रत्येक सभेंत बेरार रुरल बोरडस लॉ यांतील कलम १६ यांत सांगितल्याप्रमाणें निवडलेला चेअरमन अध्यक्ष स्थानीं असावा, त्यास विचार करून ( डेलिबरेटीव्ह ) मत देतां येतें. व जेव्हां उभयपक्षीं मतें सारखीं पडतील तेव्हां त्यास निर्णायक ( क्यास्टिंग ) मत देतां येतें.

( पुढें चालूं. )

मि. अबदुलहक्क उर्फ सरदार दिलिरजंग बहादूर यांनीं 'डेकन मायनिंग कंपनी'च्या संबंधानें चौकशी करण्या करितां कमिशन बसलें आहे तेव्हां त्या पुढें अनेक लफडीं बाहेर निघतील त्या बरोबर स्वकृत पाप पुण्याचा घडा भरून कांहीं अरिष्ट कोसळेल असें धोरण दिसल्या वरून निजाम सरकारच्या त्या कंपनींतील पुष्कळ हिश्यांचा स्वतां करितां अपहार केला होता त्या हिश्यांची किंमत कांहीं लटपटी लढवून आणि कशीबशी फेड करून निजाम सरकारच्या खजिन्यांत पोचती केली आणि निजाम सरकारच्या अफरातफरीच्या ऋणापासून स्वतांस मुक्त केलें ह्या राजनिष्ठ व उदार सेवेवरून सरदारांच्या दूरवर विचारांची अटकळ सहज होईल पण त्यांच्या धर्मेढीच्या समजा प्रमाणें कमिशनचें काम बंद न पडतां विशेष कसोशीनें चाललें आहे. दिलीरजंग बहादुरांस आपला तळीराम गार करिते वेळीं त्या कंपनींतील बड्या बड्या अधिकारी लोकांस चांगल्या वाईट उपायांनीं वशकरून घेणें भाग पडलें असें चाललेल्या चौकशीवरून कळतें.

चालूं महिन्याच्या पहिले तारखे पासून 'डेकन मायनिंग' कंपनीच्या संबंधानें कमिशनचें काम चाललें आहे तें परवां शुक्रवारीं पुरें होणार होतें आणि अखेर निकाल बहुतेक पुढील आठवड्यांत बाहेर येईल असा अंदाज आहे. ह्या कमिशनचें अध्यक्ष सर हेनरी जेम्स आहेत. अध्यक्ष व मि. लाबाऊचर यांनीं चौकशी चालली असतांना साक्षीदारांस ल्हान सहान सोपें प्रश्न विचारून मोठ्या युक्तिप्रयुक्तीनें अनेक अंतस्थ कारस्थानें उजेडांत आणिलीं आहेत. ह्या शिवाय कमिशन मध्यें सररिचर्ड टेम्पल आणि स्काटलंडचे सालिसिटर जनरल प्रभृति हुशार व अनुभविक गृहस्थ आहेत.

प्रत्यक्षपणें मि. अबदूल हक्क यांची कमिशनपुढें साक्ष होणें फार आवश्यक होतें पण ही साक्ष घेण्याचा कमिशनास अधिकार पोंचत नाहीं असें अध्यक्षकांचें ह्मणणें आहे. एका प्रकारें निजाम सरकारच्या हिश्याची तोड जोड झाली आहे ह्या वरून कमिशनचें एक मोठें काम संपलें खरें पण त्यापासून निजाम सरकार व मि. अबदुल हक्क या उभयतां मधील वाद मिटला तरी ' डेकन मायनिंग ' कंपनी खरोखर प्रामाणिकपणानें वागून विश्वसनीय असती तर निजाम सरकाराच्या तिजोरींत वीस लक्ष पौंडाची भर पडणार होती तो न पडतां त्या कंपनीच्या मूळ हिस्सेदार आठ असामींच्या हातांत ८,५०,००० पौंडे किंमतीच्या हिश्यांची व्यवस्था लावण्याचें काम होतें तें नीट झालें आहे. किंवा नाहीं ह्या मोठ्या गोष्टीचा निर्णय करणें कमिशनचें काम उरलें आहे हें सहज कळून येईल.

कमिशनच्या आरंभीं त्या कंपनीचे चेअरमन मि. ब्याटन यांची साक्ष मोठ्या मौजेची झाली. यांचें ह्मणणें असें दिसतें कीं, जों पर्यंत कांहीं बोभाटा नाहीं तों पर्यंत कंपनीचें काम स्वतंत्र चाललें असून त्यांत हात घालण्याचे प्रयोजन नाहीं असें मानणें न्याय्य होय, आणि त्या कंपनीचे हिस्से विकत घेते वेळीं कंपनीच्या प्रामाणिक पणा विषयीं विचारपूस करणें लोकांचें कर्तव्य आहे व त्या पासून चेअरमन अगदीं अलिप्त आहेत. गेल्या मंगळवारीं लार्ड कारेन्स यांनीं आपल्या साक्षींत सांगितलें कीं खुद्द निजाम सरकार या कंपनीचे शेअर विकत घेणार असें समजल्या वरून स्वतांच्या नांवावर पांचशे शेअर घेऊन निजाम सरकार मार्फत या कंपनीचा मुखत्यार होण्याचें आपखुषीनें पत्करिलें पण पुढें असा प्रकार घडेल असें स्वप्नीं पडण्याचा संभव नव्हता.

मि. अबदुलहक यांनीं विलायतेंतल्या आपल्या वकिला मार्फत कमिशन पुढें माजी सर सालरजंग यांच्या दस्तूरचें ह्मणून रेसीडेन्सी आफिसांतील सन १८८३ तलें एक पत्र दाखल करून असा प्रश्न काढिला आहे कीं हैदराबाद संस्थानांत 'डेकन मायनिंग' कंपनी उपस्थित करून त्या संस्थानच्या नामांकदीस एक दुसरी मोठी बाब जोडली या अत्युत्तम सरकारच्या कामगीरीबद्दल तैनाती वगैरा कांहीं शेअर सारख्या अन्य रूपानें देणगी स्वतां मिळण्या विषयीं निजाम सरकारच्या माजी दिवाणांचें अभिवचन आहे. या फायद्याकडे नजर देऊन दीलदार दिलिरजंग यांनीं चैनी खुषालीची चाड सोडून महत्प्रयासाची इंग्लंडची सफर केली असावी असें दिसून येतें. अनन्वित खटलीं उभारून आणि मोठमोठ्या जाहिराती देऊन निजाम सरकारच्या राज्याची उत्तरोत्तर अभिवृद्धि व्हावी ह्मणून लोकोपयोगी कामाच्या सदराखालीं लोकांस निरनिराळ्या भुलथापांनीं फसवून ' डेकन मायनिंग ' कंपनी काढण्याचे मनस्वी परिश्रम तिच्या उत्पादकांनीं व सरदार बहादुरांनी घेतले नसते तर त्यांचे आह्मीं फार फार आभार मानिले असते. हा पोकळ कंपनीचा फार्स उघडा आणि पुसतें सरदारांच्या अकलेचे वारें तुटलें इतकेंच नव्हे तर सहस्त्रावधि रुपयांची कमिशना निमित्त उधळपट्टी होत आहे आणि प्रजेची विनाकारण नागवणूक होत आहे.

गेल्या १९ वें तारखेस या कमिशन पुढें साक्षी झाल्या त्याच्या तारा आल्या आहेत त्यावरून कळतें कीं जनरल स्ट्रेची व रसेवर असलेले हैदराबादचे रेसिडेंट मि. कारडेरी या उभयतांनीं माजी दिवाण सर सालरजंग यांनीं दिलेल्या पत्राची हकिकत माहीत नाहीं असें साफ सांगितलें. ह्या दोघां पैकीं पहिल्या गृहस्थांचे बंधु सरजान स्ट्रेची या कंपनीचा व्यवस्थापकांपैकीं मुख्य आहेत ह्मणजे गुळाचा गणपती व गुणाचा नैवेद्य अशांतला पुष्कळ पर्याय आहे. रेसिडेन्सी आफिसांतून सर सालरजंगचें पत्र निघालें या विषयीं मि. कारडेरी साहेबांस मोठें गूढ पडलें आहे माजी सर सालरजंग यांचे ज्येष्ठ चिरंजीवांनीं स्वदस्तुरचे ' बांबे ग्याझेट ' वर्तमानपत्रांतील एक पत्र धाडलें आहे कीं आमच्या तीर्थरूपांनीं दिलेल्या पत्राविषयीं हकीकत सर्वथैव खोटी आहे. एकंदरींत दिलीर जंगाची होम सेक्रेटरीच्या केलेल्या हरएक गोष्टींत नाचक्की सर्वोपरीनें होईल असें खात्री पूर्वक समजतें. मि. वाटसन यांनीं साक्ष देते वेळीं युक्ति लढविली आहे कीं ' डेकन मायनिंग ' कंपनीच्या प्रकरणांत रिपोर्ट करण्यास नेमलेल्या मि. ह्यून व मि. फर्निवाल ह्या गृहस्थांस त्यांनीं आपल्या कामें आस्थेनें करावी ह्मणून दूरवरच्या कल्याणावर दृष्टी ठेवून प्रत्येकी कमी किंमतीचा व कांहीं फुकट असे पुष्कळ शेअर वाटले आणि असें करणें न्यायतत्वांशीं सर्व प्रकारांनीं संमत आहे. ह्या शेअरांची किंमत सुमारें पांच हजार पौंडावर असावी असें सांगतात. आणखी मि. मारिस मि. विशप सारख्या पुष्कळ सडरकटर लोकांनीं मि. वाटसन साहेबांच्या प्रेरणानें कंपनीच्या प्रकरणांत मोठा डल्ला मारला असावा हे उघड आहे.

हैदराबाद संस्थानच्या ' डेकन मायनिंग' प्रकरणाच्या चौकशी साठीं बसविलेल्या कमिशनपुढें हिंदुस्थान सरकारच्या ' इंडिया आफिस ' मध्यें या कंपनीच्या बाबतींत मोठा घोटाळा झाला असावा आणि लार्ड किंबरले यांनीं नेमलेल्या युरोपियन गृहस्थांनीं ही सरदार दिलीरजंग हे ' मायनिंग ' कंपनी विषयीं निजाम सरकारच्या वतीनें कायदेशीर व्यवस्था करितात किंवा नाहीं अशाबद्दल शोध व चौकशी करण्याच्या कामांत हयगय केली असावी असा ही एक महत्वाचा प्रश्न निघाला आहे. कमिशनाचा रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर अशा गोष्टींचा विचार करणें नीट पडेल ह्मणून सध्यां विशेष लिहूं इच्छित नाहीं.

मि. अबदुल हक्क हे गृहस्थ सामान्य नसून अगदीं विलक्षण आहेत. मनुष्य एक वेळ भलत्या मार्गास लागला ह्मणजे त्याचे इष्ट हेतु साधण्या साठीं उपाय भलभलते व वेडगळ असतात. आपल्या संबंधानें येणाऱ्या जाणाऱ्या तारांचा विल्हेवाट स्वतांस अनकूळ पडेल त्या व्यवस्थेनें करण्यास साधेल अशी मि. अबदुल हक्क यांनीं तीन चार तारमास्तरांस एकवट पांच हजार रुपये लांच देऊन योजना केली आहे असें समजल्या वरून निजाम सरकारचे पोलिस सुपरिंटेंडेंट कर्नल लडलो यांनी त्यांपैकीं लाचखाऊ तीन असामीस पकडून माजिस्ट्रेट पुढें खटला चालविला आहे. खटल्याच्या निकालांत आणखी काय काय निष्पन्न होतें तें पाहावें.

निजाम स्टेट रेलवेची वार्षिक सभा गेल्या मंगळवारीं विलायतेंत भरली होती त्या वेळीं मि. महेदी अलीनीं असें सांगितलें कीं अबदुल हक्क प्रकरणाच्या संबंधानें कोणी विषाद मानण्याचें प्रयोजन नसून दिवाण साहेबांकडून आलेले प्रतिनिधी आपण सर्वांच्या संमतीनें काम करण्यास मुखत्यार आहेत आणि ते करतील तें निजाम सरकारास मान्य आहे. हैद्राबाद संस्थानचा रेलवे कंपनीवर पूर्ण विश्वास आहे आणि नवीन उद्भवलेल्या ' डेकन मायनिंग ' च्या हकीकती वरून पूर्ववत् चालत आलेल्या इमान इतबाराच्या व नेकीच्या वर्तनांत तिळप्राय अंतर होणार नाहीं अशी बळकट आशा आहे.

The Berar Samachar

MONDAY JULY 2, 1888.

## AN ALLEGED ARSENIC POISONING CASE.

In the Sessions held at Amraoti by the Judicial Commissioner H. A. D. on 25th June last a case of some importance was tried. The accused had been committed to the Sessions by Mr. Eliott, first class magistrate at Amraoti. We notice the case as one in which the Judicial Commissioner has taken a view of Police working and duties which every Police officer in Berar ought to lay to heart.

The case created a good deal of sensation at Amraoti; almost all the members of the Bar were at present to see the result and a crowd of spectators througed in and outside the Court. The prosecution alleged that the three accused persons, Sivadin, Deena and Ganga, kept woman of the deceased )had conspired to poison and did actually poison one Kanhayyalal, a Kanoja Brahmin of Amraoti. The deceased had, it seems, executed a will in favor of Deena and Ganga mistress of deceased on 16th December 1887 and he died on 23rd December. The motive alleged by the prosecution was that in as much as two of the accused had a will executed in their favor, they had an interest in shoving decased Kanhyalal out of existence. The evidence brought forward by the prosecution was of a three-fold character viz. The purchase of arsenic by Sivadin one of the accused who was a close relation of Dina the other accused; the pounding of that arsenic by Ganga, the third accused and lastly the administering of that poison to deceased along with 'canji' on the morning of the deceased's death. Each of these facts was supported by the direct testimony of two eye witnesses. Some of the surrounding circumstances tending to prove the crime of the accused was that the accused Deena had quarrelled with and expelled from the house where deceased lived, one Ramlal (an alleged step-brother of the deceased )and his mother; that Deena wanted to pass himself off as a cousin of deceased altho' he was not the same kind of Brahmin as the decased; that this Deena and another man were anxious to prevent the body from being sent to the Civil Surgeon; and that a will had been executed in favor of Deena and Ganga.

The chemical Analyser to Government at Bombay found that three eight of a grain of arsenic was found in the stomach of the deceased; this fact gave strength to the prosecution theory that the man was killed by arsenic poisoning.

The Judicial Commissioner disbelieved the evidence of the supposed eye witnesses tendered by the prosecution, and for very good reasons which he embodied in an elaborate Judgment. He observed that the witnesses who saw the arsenic pounded by Ganga— and these witnesses were no others than Ramlal and his mother never once mentioned the fact to the Police in the complaint which Ramlal made to the Police on the day the deceased died or in their statement before the Punch at the inquest held that very same day— an omission extremely unaccountable. It was very unlikely too that the poison could have been mixed up with the 'Canji' and given to deceased in presence of witnesses— a fact further strengthened by the absence of any arsenics from the remains of the 'Canji' cup that was sent to the chemical Analyser.

The accused were all acquainted and the decision of the Judicial Commissioner was received with great satisfaction by

the public and the members of the Bar.

The one feature of the case commented upon at length by the Judicial Commissioner was that although doubts had been expressed as to the deceased having been poisoned in the very complaint to the Police and although there was enough to put the Police on their way to further enquiry when Dr. Hume the Surgeon of the station found it a case worth being sent up to the chemical Analyser yet the Police manifestly erred in their duty to make immediate enquiries regarding the poison. It was only after the Chemical Analysers Report from Bombay had been received stating that the arsenic was found that the Police *'worked up'* to the Report. The Judicial Commissioner has pointed out that the prosecution having failed in this case is solely due to the want of proper enquiry and action at the proper time which might possibly, if the case were a true case, have resulted in more substantial evidence than was now forthcoming.

We consider these comments of the Judicial Commissioner are so opposite and important that we have deemed it fit to give them due publicity in our Journal.

---

( Continued from our 24th number )

Until 1873 the Indian wheat export trade was cramped by an export duty; the export in that year was only one and three fourth million cwt; but since the duty was abolished the export has increased to 21 million cwts. and the history of oilseeds furnishes evidence to the same effect.

The present commercial era moreover is marked not only by an extended production of agricultural staples for sale in Europe but by a reorganization in the manufacturing system in India. The handlooms of the Indian weaver have been slowly but systematically replaced by the steam mills from England; and although at first it ruined several classes the eventual results appear to be very satisfactory.

In textile manufactures, as in the production of food-staples, India starts with certain advantages on her side. The raw material and the market for the manufactured goods lie at the Indian mill-owner's door, thus saving a double freight to England and back. Labour is cheap, abundant, docile, and not liable to strike. The enterprise yielded a profit even under the necessity of starting it by adult hands. The economical division of processes between men, women, and children has now been worked out, and the natural capability of the Indian races for the operations of textile industry is coming effectively into play. I am told indeed, that an adult English hand can seldom acquire the requisite delicacy of touch, unless the fingers have been early trained to the loom; while in India grown-up men and women easily learn the work. On the other hand, the Indian mill-owner has to overcome several countervailing difficulties. The cost of erection, including spindles and fitting up, was said in 1877 to be about three times as much as in England. The difference has since been reduced, and will be reduced still further as the supply of skilled native engineers and contractors increases. The interest on capital in India is also higher although in this respect, too, the difference is decreasing. The cost of fuel was also much greater in India, but is being diminished as railways open up the Indian coal fields. Another important consideration, difficult to estimate in all its bearings, is the quality of Indian cotton, which is short stapled, and does not admit of being spun into the finer kinds of yarn. Consequently the Indian mills can turn out only the lover "counts" of yarns, and the coarser qualities of piece-goods, leaving English imports of the higher classes untouched by their competition. India asks for no protection for her growing manufactures. If her financial necessities should compel her to have again recourse to import Customs, the competing qualities of the coarser English piece-goods will be admitted free.

This revolution in the Indian system of manufacture was compelled by English competition in Lancashire, and was initiated by British capital in India. It is being developed by native enterprise. Some of the most prosperous of the Indian cotton mills are now owned by native capitalists. In the earlier stages the outlay was very great, and some of the older mills find difficulty in competing with their new and more cheaply constructed rivals. The significence of this fact may be realised from the circumstance that within Bombay island the cost of working varies in the different mills from 17 to 29 per cent. of the value of the raw cotton used. Another significant fact is that the mill enterprise is no longer concentrated round Calcutta and Bombay, but is taking root in various local centres of industry; nor is it confined to cotton, but has been successfully applied to jute and wool. There is evidence to show that we are only at the beginning of a new era of Indian textile manufacturers, an era of the association of capital and labour with steam power on a great scale. Already Indian cottons are competing with Manchester goods, not only in India itself, but in the Straits, in China, and the markets of Eastern Asia.

(To be continued).

---

Lord Reay is to act as Viceroy of India during the month, which will elapse between the departure of Lord Dufferin (who leaves Bombay on August 17) and the arrival of Lord Lansdowne.

---

It is rumoured that peremptory orders have been received from the Secretary of State by last mail to reduce the "exodus" expenditure by making Calcutta the Government of India's head-quarters, and bringing only a flying camp to Simla. The matter however has been shelved or the present.

---

## वऱ्हाड.

हवामानः— गेले आठवड्यांत बराच पाऊस पडला. हवेंतील उष्णता बरीच कमी झाली आहे. रोगराई ह्मणण्या सारखी नाहीं.

गेल्या मंगळवारी हैद्राबादेस मोठा दरबार भरवून निजाम सरकारनीं सर अस्मान जंग यांस दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं. त्या समयीं नवीन दिवाण साहेबांस सरासरी एक लक्ष किंमतीचें जवाहीर आणि निजाम अल्लीखान यांचा दरबारचा पोषाख बक्षीस दिला असें ह्मणतात.

माजी दिवाण सर सालरजंग यांजवर निजाम सरकारची गैरमर्जी झाल्यामुळें हैद्राबाद संस्थानांत राहण्याची परवानगी नव्हती ती त्यांस आतां पूर्ववत् हैद्राबादेस येण्यास मिळाली आहे.

'डेकन मायानिंग कंपनीच्या कमिशनानिमित्त हैदराबाद संस्थानांतून विलायतेस गेलेल्या पाहुण्यांचा चांगला मानपान राखिला आहे. निजामाच्या दिवाणामार्फत नेमलेले मुखत्यार नबाब मोहसीन उलमुल्क यांस चालू महिन्याच्या आरंभी हर्बीशायरची शर्यत झाली त्यावेळीं युवराज प्रिन्स आफ वेल्स यांच्या बरोबर डबा दिला होता. या शिवाय मि. मेहदी हसन उर्फ नबाब फत्ते नवाझ जंग चिफ जस्टिस आफहैद्राबाद यांस त्यांच्या वर्णनीय विद्वत्तेबद्दल परीक्षेशिवाय बारिस्टरची पदवी सन्मानार्थ दिली आहे. 'सर्वे गुणाः कांचनमाश्रयन्ते' या नियमाप्रमाणें हा बहुमान झाला नसल्यास नबाब साहेब निजाम सरकारास एक शाहाजोग रत्न मिळालें आहे असें समजलें पाहिजे.

मि० क्राफर्ड याना निजाम सरकारचे रेलवे पोलिसांत सुपरिंटेंडंट नेमल्यावरून त्यांचे अ० सु० सेकंड ग्रेडचे जागीं मि. जे. टी. बी. डी. सुएल यांस कायम केलें.

लेफ्टेनंट कर्नल ह. जे. गंथार्प डि. सु. पोलीस हे रजेवर गेल्यामुळें मि. मोफट, मि. व्हिक्कार्णी आणि मि. सुएल यांस एकएक ग्रेड बढती मिळाली.

मि. प्लावडन सा० काश्मीरचे रेसिडेंट यांची वऱ्हाडांत कामिशनरचे जागीं नेमणूक झाली पण ते इकडे येतात किंवा नाहीं याची आतां शंका वाटूं लागली आहे. ते वऱ्हाडांत येण्यास नाखूष आहेत वं कोणी ह्मणतात ते कांहीं दिवसांची रजा घेऊन ती रजा संपल्यावर ते इकडे येतील. खरें अद्यापि कांहींच कळत नाहीं.

मि० कंबरलमे डि. सु. पोलीस यांनीं रजा घेतल्यामुळें मेसर्स मोफेट हीथ, फेजर व कुबी यांना एक एक ग्रेडची बढती मिळाली आहे.

मि० म्यामिल ए० अ० क० यांची पोलीस खात्यांत अ० सु० चे जागी नेमणूक झाली.

एलिचपूरच्या डेपुटिक्लार्कच्या जागीं पुनः रा० विठ्ठलराव केळशीकर, क्लार्क कमिशनर आफीस यांची नेमणूक झाली.

मे० आर्नर्ड साहेब अॅक्टिंग डे० क० इलिचपूर हे ८ दिवसांच्या रजेवर गेले आहेत.

रा० श्रीराम भिकाजी जठार व रा० देवराव विनायक दिगंबर यांस सरकारांतून अनुक्रमें रावबहादूर व रावसाहेब हे किताब मिळाले, त्याचें अभिनंदन करण्या करितां येथील मित्रसमाज येत्या रविवारीं भोजन समारंभ करणार आहेत.

एलिचपूरचे पो० मा० मि० मांटेथ यांस येथें पोस्टमास्तर नेमलें.

वाशीमचे पोस्टमास्तर यानें पेनशन घेतल्यावरून त्याचे जागीं येथील पोस्टांतील हेडक्लार्क रा० त्र्यंबक माधव अम्बेकर यांस नेमलें.

रा० अंनत गोविंद येथील अॅक्टिंग पोस्टमार यांस त्यांच्या खामगांवच्या कायमच्या जागीं परत पाठविलें. कारण समजलें नाहीं.

रा० रा० वामनराव बापट ए० अ० क० मलकापूर हे दोन तीन महिन्याची रजा घेणार आहेत असें समजतें.

रा. रा. सदाशिव भास्कर तहसिलदार हे येत्या अगष्टचे ४ थे तारखेस केळापुरास आपले जाग्यावर रुजू होणार असें कळतें.

रा. रा. अंबादास संतो ए० अ० क० झाल्यामुळें तहशिलदारीची जी जागा रिकामी झाली तीवर रा. रा. बळवंत बापुजी उमरावती येथील खजीनदार यांस नेमण्याबद्दल शिफारस झाली असल्याचें कळतें.

मि. सुबराव तहशिलदार मोर्शी यांचे रजेंत त्यांचे कामावर रा. रा. बळवंत बापुजी खजिनदार यांस नेमलें आहे असें कळतें.

व्यवहारादर्श नाटककार मंडळीनीं गेल्या आठवड्यांत बुधवारी रमानाटक व शनवारी तारा नाटक ह्या दोन्ही खेळांत कसरत करून दाखविली. कसरत वर्णनीय आहे. नाटकाचे प्रयोग जसें पाहिजेत तसें नाहींत साधारणं आहेत.

अगोदर सुचविल्या प्रमाणें कालरोजीं सकाळीं येथील वर्षोत्सव व्याख्यान मालीकेला आरंभ होऊन पहिलें व्याख्यान रा० रा० गणेश श्रीकृष्ण खापरडे बी. ए. एल. एल. बी. यांचें "मूलतत्वें" या विषयावर झालें. व्याख्यान विषय फार गहन असतांही व्याख्यान कारांनी तो मराठींत फार सुरेख रीतीनें समजावून दिला. रा० रा० खापरडे यांच्या व्याख्यानानंतर पंडीत बसंतराम, रा० रा० महाजनी, रोहणखेडकर यांची ही थोडथोडीं भाषणें झालीं व शेवटीं रावबहादूर जठार यांनीं सभेची समाप्ती केली.

---

( मागाहून आलेली नोटीस. )

सोनाजी वलद बाबुजी परस्कार रहाणार मौजे अगर यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी रुपये ४०० घेऊन एक घोडें आणि ४ शेतें असें महादु वलद गंभीरजी यास तावेगहाण करून दिले ते आह्मीं महादाजी वलद संभाजी याजपासून सदरील घोडें व शेतें याचा दस्ताऐवज खरेदीखत करून घेतलें आहे, तर तुह्मी ही नोटीस पावल्या दिवसा पासून आठ दिवसाच्या आंत सदरील महाप्र अगर त्याचा पैसा जो असेल तो आमचा आह्मास द्यावा. न दिल्यास रीतप्रमाणें तजवीज होईल. कळावें तारीख १ जुलै सन १८८८ इसवी.

(सही.)
पाहादरखा वलद रुस्तमखा
रोहीला रहाणार आकोलें दस्तुर खुद.

---

## वर्तमानसार.

ब्रह्मदेशांतून आणखी दोन राजकैदी व एक राणी अशी मंडळी रत्नागिरीस आणून सोडली.

येत्या आक्टोबरांत होणारी पब्लिक सर्व्हिस परीक्षा नव्या नियमा प्रमाणें होणार.

पाहिजेत—सांगलीस मिरजेस, भोरास, कारभारी व जमखिंडीस डेप्युटी कलेक्टर पाहिजे. रामदुर्गचे कारभारी अंध झाल्यामुळें तेथें ही कामाचा कारभारी नेमणें आहे.

पांचवी राष्ट्रीय सभा पंजाबांत भरावी ह्मणून तिकडील लोक आतां पासून खटपट करीत आहेत.

ब्रह्मदेशाच्या कमिशनरचा दरमहाचा पगार रु. १४०० ठरविण्यांत आला कमीका?

— काबूलच्या अमिराकरितां इंग्रजसरकारानें ४००० बंदुका पाठविल्या अहित असें समजतें.

— जर्मनीचे बादशाहा वारल्यामुळें सर्व सरकारी अधिकाऱ्यांनीं १५ दिवस सुतक मानावें असा राणीसाहेबांचा हुकूम झाला.

जर्मनीचे नवे बादशाहा दुसरे विलीयम यांच्या नांवानें जाहीरनामा प्रगट झाला.

— कलकत्यास अतिशय उष्मा होत आहे याकारणामुळें तेथील लोकांस भय पडलें आहे.

मद्रासेस जाहीर सभा भरून महाराणी साहेब यांस त्यांचे जामात एंपरर फेडरिक वारल्याबद्दल दुःखप्रदर्शक पत्र पाठविणार आहेत असें ह्मणतात.

सिमल्याला व दुसऱ्या डोंगराळ ठिकाणीं जे युरोपिअन अंमलदार जातील त्यांच्या पगारांपैकीं एक त्रितीयांश रकम कमी करावी असें जस्टीस कनिंग्याम यांचें ह्मणणें आहे.

पंजाबचे युनिव्हर्सिटीचे रजिस्ट्रार मि. लॉर्पेट यांना हिंदुस्थानसरकारनें आपल्या कामावरून काढून टाकलें.

लंडनमध्यें २०,००० दारूचीं दुकानें आहेत!!!

कलकत्यामध्यें गेल्या वर्षी सुमारें १२ लक्ष रु. दारू खपली असें समजतें.

सु० प०

माजि मुंबईचे पोलि. कमिशनर मि. सौटर मरण पावल्यामुळें त्यांच्या जागीं मि. विलसन यांची नेमणूक झाली.

मि. सौटर यांचें नांव अव्याहत राहावें ह्मणून वर्गणी उभारण्यांत आली. आजपर्यंत १३,००० रुपये जमले.

हैद्राबादचे चीफ जस्टिस व कांग्रेसचे शत्रू नबाब मेंहदी हुसेन यांस परीक्षेवाचून ब्यारिस्टर करण्यांत आलें.

लखनौच्या एका मनुष्यानें पैसे उपटण्याची एक नवी युक्ती काढिली त्यानें कित्येक बुकें छापिली व त्यांच्या प्रती व्हाल्युपेबल पार्सल करून रजपुतस्थानांतील लोकांस पाठविल्या आणि तुह्मी हिंदु असाल तर या प्रती घ्याव्या आणि चांभार असाल तर घेण्पार नाहीं असें लिहून पाठवून त्यांस त्या प्रती घेण्यास भाग पाडलें. लोक बिचारे प्रती घेत. त्याणे अशा रीतीनें बराच पैसा मिळावेला, पण आतां त्याचें तें कृत्य उघडकीस आलें आहे.

निझामांतील स्टेट रेल्वे कंपनीची स्थिती खाणीच्या कंपनीसारखी नसून उत्तम प्रकारची असें हल्लींचे प्रधान व त्यांचे साथीदार हे सांगत आहेत.

ब्रह्मदेशांत अजून ही बंडाळी सुरू असून ७००।८०० बंडखोर लोक आमचा पाठलाग करीत अहित.

ख्रिस्तीवर्गं आपल्या मुलांस शिकविला जाऊं नये ह्मणून पाचीपाचे कालेज फर्स्टंग्रेड करण्याकरता मद्रास येथील मोठमोठाले लोक वर्गणी उभारीत अहित. यांच्या या स्तुत्य कृत्यास ईश्वर यश देवो.

जर्मनींत राहून खटपटी करणारे कांहीं फ्रेंच लोक जर्मनीतून घालवून दिले.

टा० अ०

हिंदुरचे महाराजांनीं कालवे, रस्ते वगैरे लोकोपयोगी कामाकरतां सन १८८९ सालांत २८,७४,००० रु. खर्चण्याचा अजमास केला आहे. फार चांगलें आहे.

यंदा सिंधुनदीच्या थडीमध्यें गव्हाचें पीक फारच उत्कृष्ट आलें आहे.

चिपळुणास कोणी नारायण विष्णु या नांवे गृहस्थ सहकुटुंब आले आहेत. त्यांनीं शारीर शास्त्र ह्या विषयावर तेथें व्याख्यान दिलें व त्याचे कुटुंबानें त्याच विषया तेथील स्त्री समूहांत व्याख्यान दिलें. हे वरील गृहस्थ याच विषयावर शहरोशहरीं हिंडून व्याख्यानें देत आहेत. चमत्कार, हा कीं स्वतःच्या स्त्रीसही शास्त्रीय विषयावर व्याख्यान देण्यास तयार केलें आहे. पुणें वै०

पाटणा येथें न्याशनल कांग्रेस विषयीं हिंदु व मुसलमान यांचे उद्योग एक विचारानें आणि मोठ्या उमेदीनें चालले आहेत.

रंगून ता. २० जून—मंडालें शहरांत स्वस्थता आहे. आसपासचे गांवीं दरोडेखोरांचा उपद्रव चालूच आहे. पोलीस चौक्यावर ते हल्ला करितात. त्यांच्या पैकीं पुष्कळ मरतातही पण त्यांचा क्रम कमी होत नाहीं.

गोंडा ता. २१ जून—गाई वध होऊं नये ह्मणून हिंदु मुसलमान लोकांची मोठी सभा भरली होती.

सिबी नजीक जी केरोसाईन तेलाची विहीर लागली आहे त्या विहिरींतून २४ तासांत ४०० ते ५०० तेलाचीं पिपें भरून निघतात.

कोइमतूर या शहरीं गुरांचा आजार फार वाढला आहे गेले आठवड्यांत ४०० जनावरें या आजारानें मेल्या मुळें शेतीवाले लोक मोठ्या काळजींत आहेत.

बल्गेरिया प्रांतांतून प्रसंग विशेषीं १ लक्ष उत्तम कवाईत शिकलेली अशी फौज लढाईस येऊं शकेल असा अजमास आहे.

राजे सर. टी. माधवराव, मेसर्स बद्रुद्दीन तय्यबजी व सुरेंद्रनाथ बानर्जी लखनौस न्याशनल कांग्रेस (राष्ट्रीय सभा) वर व्याख्यानें देण्या करितां जाणार आहेत.

न्या. सिं.

मद्रास येथील कृषिकर्मोत्तेजक मंडळीनें असा शोध केला आहे कीं, बाराही महिने आंब्याच्या झाडापासून आंबे मिळावे

मणिपूर येथें चिनी लोकांनीं फारच हुल्लड मांडली आहे. त्याचा बंदोबस्त करण्यासाठीं तेथील सेनापतीनें १२० गुरखे व दोन तोफा तेथें पाठविल्या आहेत.

जेलम येथें महामारीनें अगदीं अनर्थ करून सोडला आहे.

नीळ विकणाऱ्या व्यापाऱ्यांपासून इन्कमट्याक्स घेऊं नये, असें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.

काश्मीरच्या सीमेचा तंटा मिटला.

सिमेवरील प्रजा राशियाच्या आधिन होण्याविषयीं राशियास विनंती करीत आहे.

अमीर आपली फौज पेशावर येथें पाठवीत आहे.

ऐर्लंडचे अंडर सेक्रेटरी वारल्याचे समजतें.

पटकीमुळें धारवाड जिल्ह्यांत चार शाळा बंद असल्याचें समजतें. ते०

...शिकचे पोलिस सु. कर्नल विल्सन साहेब यांस मुंबई पोलिस कमिशनर २००० रुपयांवर नेमलें.

क० त०

## जाहिरात.

पुणें "ज्ञानचक्षु" छापखान्यांत विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| मराठी आक्ट. | किंमत | रु. | ह. |
|---|---|---|---|
| क्रिमिनल प्रोसिजर सटिक | | ५ | ०८ |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | | ५ | ०८ |
| पिनलकोड सटीक..... | | ७ | ०८ |
| न्यायरत्न.......... | | ३ | ०८ ०२ |
| रेव्हिन्यु कोड.......... | | ०८ | ०१ |
| सदरची रुळी.......... | | ०८ | ०१ |
| स्टांप आक्ट.......... | | ०६ | ०१ |
| कोर्ट फी आक्ट........ | | ०६ | ०१ |
| कराराचा आक्ट........ | | ०१३ | ०२ |
| पुराव्याचा आक्ट........ | | ०८ | ०१ |
| रजिस्टर आक्ट........ | | ०६ | ०१ |
| मुदतीचा आक्ट........ | | ०६ | ०१ |
| आबकारी आक्ट........ | | ०७ | ०१ |
| जंगलसंबंधीं आक्ट........ | | ०८ | ०१ |
| विशेष न्यायाचा आक्ट........ | | ०८ | ०१ |
| वतनदार आक्ट........ | | ०६ | ०१ |
| लोकलबोर्ड आक्ट........ | | ०६ | ०१ |
| मनोरंजक पुस्तकें. | किंमत | रु. | ह. |
| श्री भावार्थरामायण.... | | २० | २ |
| विचित्रपुरी.......... | | १ | ०२ |
| मदनमंजरी.......... | | २ | ०२ |
| कामकंदला नाटक.... | | १ | ०२ |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ ते १० दर मागास किं. दहाही भा. वेत. ट. हा. माफ. | | ०५ | ०१ |
| अलक्षमेपलक्ष पलखमे दृर्योव... | | ०४ | ०१ |
| सतारीचें १लें पुस्तक.... | | १०४ | ०२ |
| संगीत रावाविलास नाटक. | | ०६ | ०१ |
| मदनजन्म नाटक.......... | | ०१२ | ०२ |
| चमत्कारचिंतामाणि .... | | ०१२ | ०२ |
| मल्लविद्याप्रकाश.......... | | १ | ०२ |
| ऋणसंहार.......... | | ०४ | ०१ |
| मराठी ह्मणी.......... | | ०७ | ०१ |
| गोपीचंद नाटक ( इं. ) | | ०१२ | ०२ |
| मा टी. रखुमा वर भा. | | ०१० | ०१ |

भाऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षूचे मालक.

## अवश्य पहा.

## गजकर्णावर रामबाण औषध.

वऱ्हाड व नागपूर ह्या दोन प्रांतांत हजारों लोकांस गुण येत आहे. गुणा बदल खात्री इतकीच कीं, गुण न आल्यास किंमत परत देऊं. गुणाबदल पुष्कळ सर्टिफिकिटें आहेत, त्यांपैकीं कांहीं बाटली बरोबर असलेल्या माहितीच्या कागदांत दिलीं आहेत. दर बाटलीची किंमत ०९ आणे.

## खरजेवर मलम.

गुलाबी मुळींच औषत नाहीं. पांच चार दिवस लावल्यानें खरूज, फोड, आगपैण हीं खात्रीनें बरीं होतात. किंमत दर डबीस ०८ आणे.

## हींव तापावर गोळ्या.

कितीही दिवसांनीं येणारें हींव असो सुमारें १० अगर १२ गोळ्यांनीं बंद होतें. पर बाटलीची किंमत १२ आणे.

सूचनाः—हीं सर्व औषधें अनुभवलेलीं आहेत सबब रोग्यांस अशी विनंती आहे कीं गरज पडेल तेव्हां ह्या औषधांचा अवश्य उपयोग करून पहावा. प्रत्येक औषधास बंगी खर्च ०१ आणा. बंगी नाटपेड माहितीचा कागद बरोबर. हीं सर्व औषधें वऱ्हाडांत अकोलें येथें आमचे दवाखान्यांत रोख पैशानें अगर व्ही. पे. नें मिळतील. कळावें. नारायण चिंतामण डाक्तर.

नमुना [ जी ].

नादारीच्या ठरावाची सावकारांस नोटिस देणें तिचा नमुना.

नादारी मुकदमा नंबर २

सन १८८८

विद्यमान आत्माराम भिकाजी एकस्ट्रा आसिस्टंट कमिशनर साहेब जि० बुलडाणें. यांचे नदारी कोर्टांत.

सर्वत्र लोकांस नोटीस देण्यांत येतें कीं, सय्यद कासम वल्द सय्यद हुसेन मुसलमान राहणार कसबे देऊळघाट तालुके चिखली जिल्हे बुलडाणें हा नादार आहे असा आज तारखेस ठराव झाला आहे. आणि तारीख ३० माहे जुलई सन १८८८ हा दिवस नादाराच्या सावकारांनीं जमण्या करितां आणि सावकारांनीं आपल्या तर्फेचा असाइनी नेमून देण्याकरितां व नादारानें आपल्या सुटके विषयीं दिलेल्या अर्जाचा विचार करण्याकरितां नेमिला आहे.

नादाराच्या सुटके संबंधीं ज्या सावकारांची तक्रार सांगण्याची इच्छा असेल त्या सर्वांनीं त्याबद्दल आठ आण्यांचे स्टांप कागदावर अर्ज लिहून त्या अर्जीनें नोटीस द्यावी. त्या नोटीशींत ज्या आधारावरून तक्रार सांगणें असेल, ते आणि त्याबद्दल ज्या साक्षीस समन्स करावयाची इच्छा असेल त्या साक्षदारांची नांवें नमूद करावीं. ही नोटीस जमण्याकरितां नेमलेल्या तारखेच्या निदान तीन दिवस तरी पूर्वी दाखल केली पाहिजे.

कोर्टांत सावकारांनीं पहाण्याकरितां नादारानें दाखलकेलेल्या याद्या उघड्या ठेविल्या आहेत.

ज्यास नादारावर दावे नोंदविणें असतील त्यांनीं ०८ आण्यांचे स्टांप कागदावर अर्ज करून त्यांत दाव्याची हकीकत लिहून द्यावी. व ते दावे खरे असले बद्दलचा प्रतिज्ञा लेख लिहून त्यावर अर्जदारानें आपली सही केलेली असावी.

जे सावकार दूरचे रहाणारे असतील त्यांनीं आठ आण्यांचे स्टांपावर दाव्याची हकीकत लिहून एखाद्या जुडिशियल आफिसरापुढें तिच्या खरेपणाविषयीं शपथ लिहावी आणि ती यादी टपालांतून कोर्टास पाठवावी ह्मणजे ते दावे रजिस्टरीं दाखल होतील. कळावें तारीख १९ माहे जून सन १८८८ इ०

ATMARAM BHICAJE.

नादारी कोर्टाचे जज.

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

किरकोळ अ[?]स.....................०४
नोटिशीचे दर.
१० ओळीचे आंत रु. १
पुढें दर ओळीस ०१०६
दुसरे खेपेस-..........०१

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOLXXII | AKOLA MONDAY 9 JULY 1888 | NO.2[?]

वर्ष२२ | अकोला सोमवार तारीख ९ माहे जुलै सन १८८८ इ० | अंक २[?]

Advertisements
Below 10 lines...2
Per line over 10...4
Repetition perline...

निःसंशय कायदेशीर.

## न भूतो न भविष्यति!
## फारच दुर्मिळ संधि!!!
## बृहद्राष्ट्रीय शाद्बविजिगीषा.

( शब्दांवर बक्षिसें मिळविण्याची चढाओढ. )
मराठींत, इंग्रजींत, गुजराथींत आणि हिंदींत.

### बक्षिसांत
### रुपये ३५००० चा विनियाग !!!

ह्यांत
नशिबाची परीक्षा नसून अकलेचीच परीक्षा आहे.

### सिद्धेन्दुचन्द्रिका

नामक अपूर्व ग्रंथ जो मराठींत , गुजराथींत आणि हिंदी भाषेंत प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे, त्याचे वर्गणीदारांस मात्र ह्या चढाओढींत प्रवेश करितां येईल.
प्रत्येक प्रतीस किंमत.

### दोन रुपये.

वर्गणी भरल्या बरोबर बक्षिस चिठ्ठी मिळेल. तिच्या आधारें ज्या त्या भाषेंत विजिगीषा (जिंकण्याची स्पर्धा) करण्यास सांपडेल.

### विशेष योजना.

जे गृहस्थ निरनिराळ्या तिन्ही भाषेंतील तीन पुस्तकांस एकदम वर्गणीदार होतील त्यांसच इंग्रजी भाषेंत शद्ब तयार करून विजिगीषा करण्याचा हक्क मिळून शिवाय त्या तिन्ही भाषांत ही विजिगीषा करितां येईल.
ह्या तीन प्रतींची किंमत.

### फक्त पांच रुपये.

ठेविली आहे.

सर्व खुलासेवार माहिती साठीं प्रास्पेक्टस मागावा.

### मेसर्स. जे. भाटिया ऍन्ड ब्रदर्स.

नं० ३८८, फाकलंड रोड, भायखळा.

## TO THE DEAF.

A 132 PAGE ILLUSTRATED BOOK ON DEAFNESS NOISES IN THE HEAD HOW CURED AT YOUR HOMES.
PRCE 6 ANNAS; ADDRESS DR. NICHOLSON, 5, OLD COURT HOUSE STREET CALCUTTA.

## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असेल असें समजूं नये.

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांसः—

वि० वि० आपला व माझा पूर्वींचा अगदीं परिचय नाहीं हें चांगलें नाहीं असें वाटून आपली व आपल्यातर्फे आपल्या सूज्ञ वाचकांची ओळख व्हावी अशी मनांत इच्छा धरून आपल्या भेटीस आलों आहे तर परका असल्यानें माझा अपमान न करितां व मला फारच मान न देतां कोठेंतरी कोपऱ्यांत आश्रा मिळावा अशी आपल्यास विनंती आहे.

आपल्या ह्या वऱ्हाडांतील हायस्कुलांत मुंबई इलाख्यांतील इतर हायस्कुलाप्रमाणें वार्षीक व षण्मासिक अशा दोन परीक्षा वर्षांतून होतात. वार्षिक परीक्षा आक्टोबर महिन्याचे प्रारंभी होते. ह्यानंतर दिवाळीची सुटी सुरूं होते व लागोपाठ हायस्कुलचे प्रवेश परीक्षेसंबधानें सुटी मिळते. अशी सुमारें एक महिनाभर वार्षिक परीक्षा झाल्यावर सुटी असते. ही सुटी व मे महिन्याची सुटी मिळून वर्षांत वजा जातां दहा महिने राहतात. ह्या दहा महिन्यांत वर लिहिलेल्या परीक्षा पांच पांच महिन्याचे अंतरानें व्हाव्या ह्मणजे वार्षीक जर आक्टोबर महिन्यांत होते तर सुटी संपल्यापासून षण्मासिक एप्रील महिन्यांतच व्हावी ती न होतां जूनचे पाहिले पंधरवाड्यांत होते; व नंतर वार्षिक सहा अगर पांच महिन्यांनीं न होतां केवळ तीन महिन्यानीं होते. मुंबई इलाख्यांत पाहिलें असतां वार्षीक जरी नवंबर महिन्याचे अखेरीस झाली तरी षण्मासिक एप्रील महिन्यांतच होते. आपल्या इकडे व तिकडे अभ्यास सारखेच असतात असें असून इकडील शाळांतच कां असा अनियमितपणा असावा हें कांहीं समजत नाहीं. ह्या अव्यवस्थेमुळें अभ्याससंबंधीं बिलकुल फायदा न होता उलटे तोटे मात्र फार होतात. ते असे-- वार्षिक परीक्षा आक्टोबरमध्यें होऊन दिवाळीची व प्रवेश परीक्षा होऊन मुलें अपापल्या घरून येतात व नवीन अभ्यासास सुरुवात होते. हे अभ्यास सुरू झाले ह्मणजे सुमारें मार्चे अखेर पर्यंत चांगलें सुरळीत काम चालतें परंतु एकदां सकाळची शाळा भरूं लागली ह्मणजे अभ्यासाचें कामास उतरती कळा लागते व ती एप्रिल महिन्याचे पहिले पंधरा दिवस झाल्यावर तर अगदीं अखेरीस जाऊन पोंहोचते. ह्या वेळेस शाळांचे वार्षीक रिपोर्ट जावयाचे असतात त्यामुळें प्रत्येक शिक्षक आपले कडेस दिलेलें काम करीत असतात व मुलांचे अभ्यासाकडे विशेष लक्ष दिलें जात नाहीं. "आतां ह्या पैकीं एवढें राहिलें आहे ते तुह्मी पुढच्या सुटींत संपवून टाका." असें शिक्षक आपल्या शिष्यवर्गास सांगतात व ते ही त्यास रुकार देतात. परंतु हें सगळें बोलणें त्याचे त्याच वेळे पुरतें होतें. कारण उन्हाळ्याचे दिवसांत इतर दिवसांपेक्षां निम्मे काम कमी होत असतें. कसा जरी वकशीर काम करणारा मनुष्य असला तरी ह्या दिवसांत त्याचा नियम ढळतोच ह्यांत अगदीं संशय नाहीं. तशांत ह्या वऱ्हाडांतील उन्हाळा कांहीं सामान्य नाहीं. दुपारचे बारा वाजल्या पासून संध्याकाळचे पांच वाजेपर्यंत लहाना पासून तों तहत वृद्ध मनुष्यापर्यंत प्रत्येक मनुष्य पाण्या शिवाय जसा मासा तळमळतो त्या प्रमाणें तळमळत असतो; व भांड्यांत घालून ऊकडून काढिल्या जिनसे प्रमाणें अगदीं उबून निघतो. सकाळेच नऊ वाजेपर्यंत काम करण्यास बरें असतें, परंतु जसजसा सूर्यनारायण वरवर येतो तसतशी मनुष्याचे अंगांतील काम करण्याची ताकद कमी कमी होत जाते. अंगांतून घामाच्या धारा चाललेल्याच असतात. पाण्याचा तर फार शोष लागतो व तोंडांतून हुःश हुःश असा ध्वनी निघत असतो. असा क्रम संध्याकाळ पर्यंत चालून रात्रीं जर वारा वगैरे सुटला तर कांहीं आनंद होऊन कांहीं काम करावेसें वाटतें. नाहींतर अगदीं त्राहे त्राहे होऊन जातें. अशा वेळेस विद्यार्थ्यांना आपल्या पूर्वीं झालेल्या अभ्यासास उजळणी देऊन नवीन कांहीं वाचावयास, पुढील होणाऱ्या परीक्षे करितां दिलेले असतें ते वाचावयाचे असते व आपला जो विषय कच्चा असतो तो चांगला पाहून आली त्या संबंधीं असणारी उणीव दूर करावयाची असते; इतकें करून पुढील परीक्षे विषयीं मनांत फार काळजी असतेच. आणखी हे दिवस ह्मणजे आपल्या हिंदु लोकांत लग्न कार्याचे असतात; व सरासरी प्रत्येक मनुष्यास कांहीं दिवस अजारीपणांत रहावें लागतें. इतक्या गोष्टींतून सुटीचे अखेर कोणाही मुलास त्याचे अभ्यास सर्व झाले काय असा प्रश्न केला असतां नाहीं असें उत्तर त्याचें तोंडांतून निघतेच. ही सुटी मुलांनां केवळ नांवाचीच असते तिचा खरा उपभोग त्यांना घेण्यास सवड सांपडत नाहीं. मुंबई, पुणें वगैरे ठिकाणची हवा किती सुखावह ह्या दिवसांत असतें बरें; असें असून तिकडे ही षण्मासिक परीक्षा एप्रील महिन्यांत घेऊन निकाल सुटीचे आधीं सांगतात; व सुटींत पुढील नवीन अभ्यास करावयास ताकीद देतात. ह्यामुळें तिकडील मुलांस आपण कोणत्या विषयांत कमी आहोंत हे समजून तो पुरा करण्यास सांपडते व मन रंजनार्थ नवीन वाचतां येते. सुटी नंतर मुलें शाळेंत आल्यावर अभ्यासही तडाक्यानें चालतो परंतु आपले इकडे तसें नाहीं अगदीं उलट आहे. मुलें शाळेंत आल्यावर जूनचे १०।११ ला परीक्षा सुरूं होऊन निकाल लागे पर्यंत सर्व महिना फुकट जातो. ह्या मुळें एप्रील, मे व जून असे तीन महिने फुकट जातात असें ह्मटलें तरी चालेल. नंतर वार्षिक परिक्षेस सारे तीनच महिने राहतात सबब शिक्षकांची व शिष्यांची राहिलेले विषय कसे तरी संपवून टाकण्याचे कामांत अगदीं गर्दी उडते. दुपारचे ११ वाजल्या पासून संध्याकाळचे सात वाजेपर्यंत सतत मेहनत करावी लागते. अशा तऱ्हेनें धांवपळ धांवपळ करून जसा एखाद हेलकरी आपल्या डोक्यावर दिलेला बोजा लळत लोंबत कसा तरी ठरीव ठिकाणीं एक दांचा नेऊन टाकतो त्या प्रमाणें विद्यार्थ आपलें काम आटपून घेतात. मुलांनीं शाळ सुटल्यावर संध्याकाळचे दोन तास कसर करून आपलें काम करण्यास सशक्त व्हा अशा हेतूनें सरकारने ह्या शाळांतून कस तीचें सामान दिलेलें असतें परंतु मुलांस गांतच सात वाजे पर्यंत राहावे लागते मग कसची कसरत आणि कसचे खेळणें असें लांस होऊन जातें, ह्यामुळें सरकारचे हे कडे अगदीं दुर्लक्ष होतें. इतक्या गैर सो षण्मासिक परीक्षा जून महिन्यांत होते त्याव अवलंबून आहेत. तीच जर परीक्षा एप्रील हिन्यांत होऊं लागली तर मुलें वर्गांत लेल्या त्या महिन्यांपर्यंतचा अभ्यास लक्ष्य लावून करतील; व सुटीचा चांग उपयोग करून नंतरचें काम करण्य त्यांस चांगली हुशारी वाटेल; व अभ

स पहिल्यापेक्षां कदाचित् जास्त होतील. त्यास संध्याकाळीं शाळेंत फार वेळ बसावें न लागून सरकारचा हेतू ही सिद्धीस नेतां येईल. या कडे आपले शाळाखात्याचे वरिष्ट अधिकारी लक्ष्य पुरवून वर लिहिलेली शाळेंत जर सुधारणा करतील तर त्यांचे मुलांवर व मजवर विशेष उपकार होतील. बरें पत्रकर्ते राव पत्रविस्तार फार झाला सबब आपली माफी मागून पुरें करितों.

आपला

" एक हितचिंतक "

वऱ्हाडसमाचार.

मिती ज्येष्ठ वद्य ३० शके १८१०.

## मुंबई इलाख्यांतील दोन कमेट्यांची हकीकत.

( २१ वे अंकावरून पुढें चालूं. )

आतां मेमराबाद येथील कमेटीचें वर्तन सर्वथा बरोबर आहे कीं नाहीं हें कळण्यापूर्वी तेथील सर्व गोष्टी आह्मांस कळविल्या पाहिजेत; ह्मणजे त्या ठिकाणीं मालावरील जकात खेरीज करून दुसरा एखादा कर बसवितां आला असतां किंवा नाहीं या विषयीं माहिती समजल्या शिवाय कमेटीचें वर्तन बराबर होतें असें आह्मांस ह्मणतां येणार नाहीं. सरकारनें एखादी गोष्ट हट्टानें अगर गैर समजुतीनें एखादे वेळीं नाहीं ह्मटली असतां दुसरी एखादी तोड काढून समेट होण्याचा मार्ग असल्यास तो ग्रहण करावा. असें आमचें मत आहे. कारण राज्यकर्ते व प्रजा यांमधील जो संबंध हल्लीं आहे तो असाच आहे कीं आपला स्वतःचा सन्मान राखून एखादी गोष्ट कमेटीस सरकारचे करणी प्रमाणें करतां आल्यास फार बरें आहे. सर्वांनी ही गोष्ट ध्यानांत ठेवण्या जोगी आहे कीं, प्रत्येक कमेटीचे अगर लोकल बोर्डाचे मेंबर यांचें वर्तन वरील नियमांस अनुसरून असलें पाहिजे. स्थानिक स्वराज्याचा वऱ्हाडांत तरी निदान नुकताच प्रारंभ आहे ह्मणून प्रारंभीच असले प्रसंग टाळवतील तितके टाळले पाहिजेत. आतां आमचे असें ह्मणणें नाहीं कीं ज्या प्रमाणें डेपुटी कमिशनर ह्मणतील त्याप्रमाणें सर्वांनीं केलेंच पाहिजे परंतु आमचें ह्मणणें एवढेंच आहे कीं, कोणत्याही गोष्टीचे योग्यायोग्यतेचा नीट विचार करून त्याबद्दल सावकाबाक प्रमाणें अर्थात् आपापल्या समजुती प्रमाणें सरकारापुढें ठेवण्याचें प्रत्येक कमेटीचे मेंबराचे व लोकल बोर्डाचे मेंबराचें काम आहे. इतके झाल्या नंतर ही डेपुटी कमिशनर व कमेटीचे दुसरे सभासद यांचा मतभेद झाला तर योग्यायोग्यतेचा जास्त पूर्ण पणें विचार करून आपला सन्मान राखून होईल तितकें समेटकरण्याकडे लक्ष्य असावें. स्थानिक स्वराज्याचे आरंभींच तंटेबंटे वगैरे झाल्यास कदाचित आपणास मिळालेले हक्क नाहींसे होण्याचा अगर कमी होण्याचा संभव आहे ही गोष्ट लक्ष्यात ठेवून काय करणें तें केलें पाहिजे.

आतां आमदाबाद येथील म्युनिसिपल कमेटीची हकीकत अशी आहे कीं, त्या शहरांत मोठी मोरी करण्याची अवश्यकता आहे असें पुष्कळ दिवसांपासून तेथील कमेटीस ही वाटत आहे. यामुळें मुंबई सरकारनें मोरी कशी असावी या विषयीं एक नकाशा तयार करून कमेटीकडे मंजुरातीस पाठविला. मोऱ्या अच्छादीत असाव्या उघड्या असूं नये अशा विषयीं सरकारचा अभिप्राय होता. परंतु कमेटीनें गटारें बांधणें ती उघडी असावीत ह्मणजे ज्या प्रमाणें हल्लीं आकोल्यास गटारें आहेत तशी अर्ध वर्तुळाकार असावींत असा ठराव केला. अर्थात् सरकारास कमेटीनें आपलें ह्मणणें सर्वांशीं मान्य न केल्यामुळें व अप्रशस्त वाटून त्यांनीं एक ठराव प्रसिद्ध केला कीं आमदाबाद येथील कमेटीनें सरकार कडून गेलेला नकाशा सर्वैव मंजूर न केल्यामुळें सरकारास फार दिलगिरी वाटत आहे. असें ह्मणून कमेटीनें आपले ठरावाचा पुन्हा विचार करावा असें कमेटीस सुचविलें. त्यानंतर कमेटीनें पुन्हा विचार करून सरकारनें पाठविलेला नकाशा मंजूर केला.

मोऱ्या उघड्या असाव्यात किंवा बंद केलेली गटारें असावींत या विषयीं सुधारलेल्या देशांत देखील अद्याप तंटा आहे. ह्मणजे कित्येक ह्मणतात कीं, गटारें उघडीं असलीं ह्मणजे सूर्याचा प्रकाश त्यांतील घाणीवर लाऊन घाण दूर होतें व मोऱ्या स्वच्छ करण्यास ही चांगल्या सांपडतात. या प्रकारच्या मोऱ्या आकोल्यास आहेतच. दुसरे कित्येक ह्मणतात कीं मोऱ्या बंद असल्या ह्मणजे त्यांतील दुष्ट हवा व घाणीचे पदार्थ बाहेर येत नाहींत व बाहेरील हवा खराब होत नाहीं; तीच मोऱ्या उघड्या असल्या ह्मणजे हवा अगदीं बिघडून जातें. असा मतभेद असतांना मुंबई सरकारनें कमेटींत एवढा जुलूम कां करावा हें कळत नाहीं. खुद लंडन शहरासंबंधानेंसुद्धां असें ह्मणणें आहे कीं तेथें बंद केलेल्या मोऱ्या केल्या गेल्या ही मोठी चूक झाली व त्या प्रमाणें मुंबईंतील मोऱ्या संबधानेंही कित्येकांचें ह्मणणें आहे. असें असून सरकारनें कमेटीस अमुकच तऱ्हेच्या मोऱ्या करा हें ह्मणणें प्रशस्त दिसत नाहीं. आतां कमेटीनें कदाचित् हट्ट धरला असतां तरी सरकार कमेटीचें ह्मणण्यास शेवटीं रुकार देतें ह्मणून हल्लीं कमेटीनें सरकारचें ह्मणणें कबूल केलें हें एक प्रकारचें शहाणपणच केलें असें ह्मटलें पाहिजे. सत्तेपुढें शहाणपण नाहीं ही ह्मण सुप्रसिद्धच आहे. असला ही प्रसंग कधीं कधीं वऱ्हाडांत येईल. वऱ्हाडांतील अधिकाऱ्यांचा बहुतेक ग्रह असा दिसतो कीं मोऱ्या उघड्या असतील तर बऱ्या व लोकांस ही तसेंच बरें वाटत असल्यामुळें या संबंधानें कदाचित् तंटा होणार नाहीं पण दुसऱ्या गोष्टींत कदाचित असाच मतभेद होऊन सरकारचें ह्मणणें केवळ सरकारचें ह्मणणेंच ह्मणून कबूल करावें लागेल. त्यावेळीं कमेटीचें मेंबराचें व लोकल बोर्डाचे मेंबरांचें हेंच कर्तव्य आहे कीं, आपलें काय ह्मणणें आहे हें डेपुटी कमिशनर अगर कमिशनर यांस नीट रीतीनें समजून दिलें पाहिजे. व असें केल्या वर पुन्हा कोणतीही गोष्ट केवळ नाइलाजास्तव कमेटीस अगर बोर्डास करावी लागेल तर त्यांच्यावर लोक तरी निदान दोष ठेवणार नाहींत.

आयरलंड देशांत मि. पार्नेल यांच्या अध्यक्षते खालीं पार्लमेंट संबंधानें आज चार वर्षांपासून गडबड सुरू आहे ती मोडून टाकून स्वस्थता करण्यासाठीं नवीन क्रिमिनल कायदा इंग्लंडानें त्या देशास लागू केल्यामुळें उत्तरोत्तर बंडाळी अधीक मानत चालली आहे ह्मणून तो कायदा वाईट आहे असा प्रश्न हाऊस आफ् कामन्स मध्यें प्रसिद्धीस आलेले गृहस्थ मि. जान मार्ले यांनीं गेल्या मंगळवारीं काढिला होता. आयरलंडची प्रजा या कायद्या मुळें मनस्वी त्रस्त झाली आहे तेव्हां तो बंद व्हावा ह्मणून मि. ग्लाडस्टन यांनीं आपलें मत प्रदर्शित करून मि. जान मार्ले यांच्या ह्मणण्यास विशेष बळकटी आणिली होती. परंतु दुसरे दिवशीं भवतिनभवति झाल्यावर मि. जान मार्ले यांचा प्रश्न ८९ मतांनीं नामंजूर झाल्याची तार आली आहे हें ऐकून समदुःखी नेटीव लोकांस अत्यंत वाईट वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

खिमा नाईक नांवाचा भिल्ल प्रसिद्ध बंडखोर तंट्याभिल्लाला सामील असल्याचें ठरल्यावरून त्यास सात वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा मोहो येथील जज्जांनीं फर्माविली आहे ह्या नायकाच्या चौकशींत कांहीं सरकारी कामगार तंट्याभिल्लास साथ असल्याचें बाहेर आलें आहे तेव्हां त्या संबंधानें काय निर्णय होणार हें अद्याप पक्कें समजलें नाहीं.

हिंदुस्थान सरकारकडुन ग्याझेट आफ इंडियामध्यें तारीख २ जूनची जाहिरात प्रसिद्ध झाल्या प्रमाणें सरकारास तीन कोट रुपये कर्जाऊ पाहिजे होते त्या ऐवजीं सात कोटीहून जास्त रकमेची टेंडरें लोकांनीं दाखल केलीं आहेत. ही मोठी रक्कम सरकारास कर्जाऊ देणाऱ्या मंडळींत बहुतेक ल्हान मोठ्या पेढ्या कांहीं पार्शी गृहस्थ व थोडे गुजराथी गृहस्थ हीं आहेत, आणि ब्राह्मणपैकीं एका ही व्यक्तीचें नांव नाहीं हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. एकंदर टेंडरावरून पाहतां सरकारांत शंभर कर्जाऊ रुपयाबद्दल रोख ९९ रुपये १२ आणे ७ पै या भावानें ह्या तीन कोट रुपयांच्या ऐवजीं २९९३६९०१ रुपये ७ आणे नगदी जमा झाले आहेत.

जर्मनीचे नवीन बादशहा रशियाच्या झाराची समक्ष भेट घेऊन उभय देशांतील सलोखा वाढवावा ह्मणून खुद रुस देशास जाणार आहेत. एकंदरींत युक्ति चांगली लढविली आहे.

## The Berar Samachar

MONDAY JULY 9, 1888.

### THE EVILS OF A HIGHLY CENTRALISED GOVERNMENT.

What is the great feature brought out in this Congress held in Madras, which represented Mahomedans, Parsis and all the tribes of India? It is that these men, who as fully represent teeming millions of India, as our House of Commons represents Englishmen—it is that these representatives of the wealth, intelligence, and education of India feel that they have a foe, who will be their ruin if he succeeds, and that foe is also the foe of England—Russia! Will England rise, throwing away the good will, the warm friendship of an impulsive Eastern race, because a few addle-headed, red tape officials safe in their Government offices raise a cry of alarm at a movement which which is not moving on the slow eternal wheel of a Government office coach! God forbid.

To the *Pioneer* the above will appear unmitigated nonsense. But no, the English paper, who writes from a distance and has no prejudice, is quite right in what he says. We shall try to prove it. We hope we shall not be hanged for stating that, it is not quite safe to take all protestations of loyalty from the people and princes of India without some reservations. British rule in India will be a danger from the attacks of the Russians, if it is not heartily supported by the people. British rule will be absolutely safe, if it is supported by the people. The myriads of India guided by British genius, prowess, and resources, may defy the combined resources of all Europe.

The people will support the British rule if they find it worth their while. If the people of India are treated as a conquered race, they will never support the British rule with heart. Those who expect it are mad men or idiots. And says the *Daily Chronicle:*—

No. 1255 G.— Kumar Shree Harbamji Rawji, Attache to the Resident at Hyderabad, is appointed to officiate, temporarily, as an Assistant Commissioner of the 3rd Class in the Hyderabad Assigned Districts, with effect from the date of assuming charge.

No. 1267-G.— Lieutenant M. A. Tighe, Madras Staff Corps, Commandant of the Resident's Escort at Hyderabad, is appointed to officiate as a Political Assistant of the 3rd Class, and is posted as Assistant to the Resident, and to the General Superintendent of Operations for the Suppression of Thagi and Dakait, at Hyderabad, with effect from the date of assuming charge.

## वऱ्हाड.

हवामानः— गेले आठवड्यांत पाऊस बराच आला. हवेतील उष्णता पुष्कळ कमी झाली रोगराई ह्मणण्यासारखी नाहीं.

मे. राईट साहेब येथील दि. सु. पोलीस इन्स्पेक्टर जनरलचे जागीं जाणार ह्मणून मागें कळविलें आहेच. त्यांचे जागीं येथें मे० काटग्रेव्ह साहेब येणार व त्यांचे जागीं बुलढाण्यास मि. सुएल असि० सुप० पोलीस यांस पोलीस सुप० नेमलें असें समजतें.

मि. सुएल हे अल्पवयस्क असून नुकतेंच पोलीस खात्यांत कायमचे अ० सु० पोलीस झाले व हल्लीं त्यांस पोलीस सु० नेमलें. जिल्ह्याचे पोलीस सुप० चे काम स्वतंत्र रीतीनें करण्याची लायकी मि. सूएल यांचे आंगीं फारच लवकर आली!

रा. रा. बाळकृष्ण बळवंत सुळें उमरावती स्मालकाज कोर्टाचे क्लार्क यांस मोर्शीस अ० तहसिलदार नेमलें.

शेवटीं या प्रांताचे कमिशनरचे जागीं मि. प्लौडन यांचीच योजना झाली असें समजतें.

गेल्या थोड्या दिवसांत येथें बऱ्याच चोऱ्या झाल्या. पोलीसांचा तपास चालू आहे. पत्ता एकीचाही नाहीं. पोलीसांची आपल्या कामीं तत्परता व दक्षता किती आहे याचा ह्यावरून तर्क केल्यास तो पोलिसास किती अनकूल असा होईल याचा पोलिसांनींच विचार करावा.

रा. रा. पंडित बसंतराम यांनीं काल रोजीं सकाळीं नेटीव जनरल लायब्ररींत " प्राणीजभक्ष्य ' ह्यावर व्याख्यान दिलें. व्याख्यानकारानें पुष्कळ माहिती दिली व तिजपासून चांगलें चांगलें सिद्धांत काढून मांसाहार अनावश्य आहे व तो मनुष्यानें करावा असा ईश्वरी संकेत ही दिसत नाहीं असें स्पष्ट दाखविलें. नंतर रा. रा. माहाजनी यांनीं ही ह्या विषयावर थोडेसें पण चांगलें भाषण केलें. ह्या भाषणा पासून मंडळीस शास्त्रीय ज्ञानाचा थोडासा लाभ झाला. नंतर आणखी कांहीं भाषणे होऊन हें व्याख्यानमालेचें तिसरें व्याख्यान आटोपलें.

आज उमरावतीस कानफरन्स भरून रा. गणेश श्रीकृष्ण खापरडे यांनीं जो रेव्हेन्यू कोड तयार केला आहे त्याचा विचार होणार आहे. त्या करितां या जिल्ह्यांतून रा. खापर्डे व रा. गणेश बापूजी तहशिलदार हे जतपत ...तील व आहेत असें समजतें. मे. कमिशनर... सेवा क-

अध्यक्ष आहेत.

हैदराबादच्या रेसिडेंन्टच्या जागीं सर लेपेल ग्रिफिन येतील अशी बातमी आली होती; पण तींत विशेष तथ्यांश नाहीं असें आतां ह्मणतात.

ज्युडिशियल कमिशनरच्या जागीं मे. कर्नल स्पांकी साहेब कायम होणार असें ह्मणतात.

रा. कुमार श्री हरबानजी आव्याची यांस आर्कटिंग कमि. नेमलें.

वार्षिक परिक्षांच्या तारखा— हायस्कूल व ट्रेनिंगकालेज वर्ग परीक्षा—१७ आक्टोबर. हा० स्कूल व इंग्लिश हिंदु० स्कूल प्रवेश प० १२ नोवेंबर. ट्रेनिंग कालेज प्र० परिक्षा २ नोवेंबर व्हर्न्याक्युलर स्कालरशिप प० ७ जानेवारी. शिक्षक समाज ता० १९ नोवेंबर

उमरावतीस रा. रा. रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांनीं "राष्ट्रीय सभेविषयीं भाषण करून "रास्ट्रीय सभा" ह्मणजे काय व तिचे उद्देश काय आहेत हें सर्वांस समजावून सांगितलें. तसेंच, या विषयाची चांगली माहिती व्हावी ह्मणून "मौलवी फरिदुद्दिन व रामबक्ष यांचा संवाद" या पुस्तकाच्या प्रती सर्वांस वाटल्या.

नोटीस.

रा. रा. ठाकूरदास खेमराज वहिवाटदार लक्ष्मणदास राजाराम दुकान आलेगांव तालुके बाळापूर जि० आकोलें यांसः—

खालीं सही करणार याजकडून तुह्मास नोटीस देण्यांत येते कीं, मी तुह्मास गहाण शेत दिडशे १५० रुपयास दिलें होतें ते शेत मी हल्लीं सरदारशिंग जमादार पातूरकर यांस विकलें आहे. तुह्मी पातुरास आले होते त्यावेळेस तुमची व सरदारशिंग जमादार याहाची भेट झाली त्यावेळेस तुह्मी माझे समक्ष त्याहास कबूल केले कीं माझें २१० आडीशे रुपये निघतात व तुमचे जवळ माझें गहाणखतांचें रुपये ठेवावें त्या प्रमाणें तुमचे रुपये सरदारशिंग जमादार याहाणी मजवळून खरेदीखतांच रकमेंतून कापून घेतले आहे तर तुह्मास या नोटीशीनें असें कळवितो कीं, तुमचे रुपये सरदारशिंग जमादार या जवळ मी धरवर ठेविली आहे; तर दस्ताऐवज त्याहाजवळ आणून देऊन रुपये घेऊन जावे. पुढें तुमचे गहाणखताची तकरार मी ऐकणार नाहीं; किंवा रुपयाबद्दल कोर्टांत फिर्याद केल्यास त्याचा खर्च मी देणार नाहीं. करितां आठ दिवसाचे आंत तुम्ही पातूर येथें येऊन तुह्मी सरदारशिंग जमादार याहास कबूल केल्या प्रमाणें आपले रुपये घेऊन जावें. यापुढें मी तुमची तकरार ऐकणार नाहीं कळावें.

तारीख १३ माहे जुलई सन १८८८ इसवी.

( सही. )

आमचे इथ... वलद माहादु माळी बंड ण जाणें. इकडील ...णार खानापूर ता. प्रकार होतो ह्मणावें तर आपल्या ...आकोले विषयीं तत्पर असे कसे लोक निपजतात. असो, बाहेर लोक निपजतात. यांचें हें वळण पाहून या पुढें तरी जागृत होतील तर पहावें.

मुंबई कॉलरा व स्पर्शजन्य रोगांसाठीं खेतवाडीमध्यें मुनसीपालिटीच्या तर्फे एक इसपितळ बांधण्याचा विचार चालला आहे. या इसपितळापासून आसपासचे रहणारे लोकांस फार त्रास होईल अशी भिती आहे, करितां हें इसपितळ येथें होऊं नये अशाबद्दल अर्ज करण्या करितां आसपासचे सर्व लोकांची एक मोठी सभा आज रविवार तारीख ८ माहे जुलई सन १८८८ रोजीं सायंकाळी चार वाजतां "कामा" बागमध्यें भरणार आहे. त्यावेळीं या अर्जाचा विचार करण्या करितां सर्वांनीं मेहरबानी करून यावें अशी विनंती आहे.

डेकनमायनिंग कमेटीच्या चौकशीचें काम आटपून त्यांचा रिपोर्ट १०, १५ दिवसांत बाहेर पडेल असें समजतें.

इंजिनियर कालेजांत पास होणाऱ्या पहिल्या तीन गृहस्थास एकदम आसिस्टंट इंजिनियरच्या जागा मिळत असत; पण त्या सन १८९१ पासून म्हणजे आणखी तीन वर्षांनीं मिळणार नाहींत असें ता. १९ जून १८८८ च्या ठरावांत सरकार म्हणते. सन १८९० सालांत जे पास होतील त्यांना मात्र जागा मिळतील. या अन्यायाच्या ठरावाबद्दल सरकारास अर्ज पाठविण्याची तजवीज झाली पाहिजे.

राव बहादूर माधवराव गोविंद रानडे यांस पुण्यास असिस्टंट जज्ज नेमणार अशी बातमी आहे.

इंग्लिश सरकारानें अयुबखानास आपल्या देशांत ठेविलें आहे. हें रशियाच्या झार साहेबांस कळविण्यासाठीं असबखान नांवाच्या मनुष्यास अमिरांनीं रशियांस पाठविलें आहे असें म्हणतात.

बडोद्याचे हल्लींचे रेसिडेंट सर आलिवर सेंटजान हे आक्टोबर नंतर म्हैसुरचे रेसिडेंट होणार असें समजतें.

विलायतेंत शाली तयार करून त्यांना कांहीं सुवासिक लावून त्या युरोपियन लोक काश्मीरच्या शाली म्हणून विकतात!

सु० प०

गेले वर्षी विलायतेहून २४ लक्ष रुपयांच्या आगपेट्या व १३४२५२५ रुपयांचे बुट इकडे आले. त्याचप्रमाणें ३७०१०२९ रुपयांच्या छत्र्यांचा इकडे खप जहाला. विलायती व्यापारी हिंदुस्थानांतून कसा व किती पैसा ओढीत आहेत, यांचें अनुमान वरील आंकडे चांगल्या प्रकारें दाखवीत आहेत, आमच्या लोकांस विलायती माल वापरण्याची लागलेली सवय कधीं नाहींशी होईल व त्यांचें हीत त्यांस कधीं कळूं लागेल तोच सुदीन समजला पाहिजे. तोपर्यंत हिंदुलोकांचे अशा प्रकारानें परदेशी पैसे जावयाचेच!!!

चमत्कारिक शर्थी खंडाळे महालांत एका गांवीं गाईस दोन तोंडाचें व चार डोळ्यांचें वासरू होऊन लागलेंच मेलें.

नबाब असमतशहा यांस दिवाणगिरीचा अधिकार देतांना निजाम साहेबांनीं १ लाखाचें जवाहीर व एक दरबारी.पोषाख दिला.

पेरीश लोकांनीं साम्बगैरे रोगाचा प्रादुर्भाव जवर जो ज...

सर्ते. परंतु प्रत्येक मनुष्य प्रकृती बद्दल काळजी वाहणारी प्राबल्य न वाटतां जेव्हांचें निर्मूल होतें हल्लीं शेतांचें

पोलिसांतल्या लोकांस पोहतां आलें पाहिजे—कराचीस एका वेडेचोरास पोलिसाचा शिपाई त्याचे धोतर पकडून ठाण्याबर नेत असतां त्या चोरानें तें आपलें धोतर अंगावरून काढून टाकून जवळच आग होता त्यांत उडी टाकली आणि पोहून तो पलीकडे गेला. आणि बिचारा पोलिसचा शिपाई! त्याला पोहतां येत नसल्यामुळें तो वेड्या सारखा तेथेंच त्याजकडे पहात उभा राहिला. यासाठीं, पोलिसांतल्या सर्व लोकांस चांगलें पोहोतां आलें पाहिजे असा त्या खात्यांतील अधिकाऱ्यांनीं योग्य ठराव करून, त्याप्रमाणें ज्यांस पोहतां येत नसेल त्यांनां पोहण्यास शिकविण्याची व्यवस्था ठेविली पाहिजे, असें सिंधग्याझटेच सुचविणें आहे.

जुबिली मेमोरियल-मद्यपान निषेध—राणी सरकारच्या राज्याचे पंनासाव्या वर्षाच्या महोत्सव प्रसंगीं अनेकांनीं अनेक मागणी राणीसरकाराकडे केलीं. त्यांतच, लंडन वगैरे ठिकाणच्या ११,१२,६०८ स्त्रियांच्या सह्यांचा एक अर्ज राणीसरकाराकडे गेला आहे. त्या अर्जांत सह्या करणाऱ्या स्त्रियांनीं अशी विनंती केली आहे कीं,/ निदान रविवारच्या दिवशीं तरी आपल्या राज्यांत मद्यविक्रय बंद करावा; व ही आपल्या ५० व्या राज्याब्दाची मोठी देणगी असें समजलें जाईल. त्या अर्जदार स्त्रियांत, मिसेस मार्गारेट ब्राइट लूकस, "जगांतील स्त्रीमंडळीच्या मद्यपाननिषेधक सभेची" अध्यक्षा आणि लंडनच्या बिशपाची पत्नी मिसेस टेंपल या बायांसारख्या थोर बायका प्रमुख आहेत. त्या अर्जांत एक विशेष गोष्ट अशी दाखविण्यांत आली आहे कीं, एका खेडेगांवांत ४२ मद्यविक्रीचीं दुकानें आहेत; परंतु त्या सर्व गुत्तेवाल्यांच्या बायकांनींही वरील अर्जास आपली संमति देऊन त्या खालीं सह्या केल्या आहेत! मात्र तेथील ४ गुत्तेवाल्यांच्या बायकांनीं सह्या केल्या नाहींत. असें मुंबई गार्डीयनपत्रावरून कळतें. वरील अर्ज राणीसाहेबांस कसा काय मान्य होतो व त्यावर त्या काय जबाब देतात तो बघणें आहे.

नफा—एकानें एका मोठ्या बाजारांत कांहीं साखर खरेदी केली. परंतु घरीं गेल्यावर त्याला समजलें कीं, दुकानदारानें आपल्याला फसवून एक धेला पांढऱ्या वाळूचाच धुसडून दिला तेव्हां त्याणें तेथील पत्रांत एक जाहिरात प्रसिद्ध केली:—"मी बाजारांत कांहीं साखर खरेदी केली. परंतु तींत एक धेला पांढऱ्या वाळूचाच लागला. व हा मुद्दाम मला फसविण्या करितां दुकानदारानें दिला अशी माझी खात्री आहे. तर, ह्या नोटीशीनें मी असें कळवितों कीं, ज्या दुकानदारानें मला फसवून हा माल दिला त्याबद्दल साखरेचा धेला, माझ्या खालीं लिहिलेल्या पत्त्यावर, बिन बोभाट पाठवून द्यावा. नाहीं तर त्या फसविणाऱ्या दुकानदाराचें नांव मी याच वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध करून त्याची बदनामी करीन! कळावें, ता०—माहे—सन—इ०, पत्ता—"

या नोटीशीचा परिणाम काय झाला बघा! ही नोटीस प्रसिद्ध झाल्या बरोबर दुसरेच दिवशीं साखरचे नऊ धेले त्या गृहस्थाचे पत्त्यावर येऊन दाखल झाले! हें कां! हें येथें सांगावयाची जरूर नाहींच. सर्वच व्यापारी फसवणारे तेथें प्रत्यकानें आपल्या नांवाचा बोभाट होऊं नये म्हणून गपचूप रीतीनें भराभर साखरेचे धेले पाठवून दिले!

शा. च.

## बरार रुरल बोरडस लॉ सन १८८५ यांतील कलम३३ अन्वयें नियम.

(२१ वे अंकावरून पुढें चालूं.)

३१ प्रत्येक जिल्हा व तालुक बोर्डानें आपापला सेक्रेटरी नेमावा. तो बोरडचा मेंबरच असला पाहिजे अशी जरुरी नाहीं. त्याणें बोरडचा सर्व पत्रव्यवहार चालवावा व हिशोब ठेवावे. व प्रत्येक सभेचें काम नेहमीं दाखल्या करितां ठेविलेले मिनिट (टिपण) बुकांत लिहित जावें. ह्या लेखावर चेअरमन व सेक्रेटरी यांणी सही करावी. व तो बोरडचे सर्व मेंबरांस पहाण्यास मोकळीक आहे. सेक्रेटरीची नेमणूक कमिशनरचे मंजुरानें केली पाहिजे.

३२ प्रत्येक सभेकरितां नेमलेले तारखेचा व त्या सभेंत साधारण परत्वें ज्या कामासंबंधीं वादविवाद होण्याचा त्याजबद्दल योग्य नोटीस सेक्रेटरी याणें जिल्हा बोरड तालुक बोरडचे मेंबरास द्यावी.

३३. चेअरमन यांणीं जें काम सभेपुढें आणण्याचें त्या सर्व कामांचे क्रमाची तजवीज ठेवावी व बंदोबस्त ठेवावा.

३४. प्रत्येक सूचना किंवा तींत केलेली दुरुस्ती योग्य प्रकारें अनुमोदीत झाल्यावर जर त्या संबंधीं मतभेद होईल तर त्याबद्दल मत घेण्या पूर्वी ती लिहून ठेवावी.

३५. जिल्हा बोरडचे किंवा तालुक बोरडचे सभेस लोकांस येण्यास प्रायः मोकळीक आहे. परंतु हजर असलेले मेंबरांपैकीं $\frac{2}{3}$ नां मान्य केलेले सूचने वरून परकी लोकांस सभेचे बाहेर जाण्यास सांगावें.

३६. एखादे जिल्हा बोरडास किंवा तालुक बोरडास साधारण कामाचें कारणा करितां आपले मेंबरांपैकीं एक किंवा अधिकांची कमिटी कोणतें एखादें काम अगर काम चालविण्या करितां किंवा एखादें गोष्टीबद्दल निकाल करण्या करितां किंवा रिपोर्ट करण्या करितां नेमण्याचा अधिकार आहे. व अशी जरूरी असेल त्या प्रमाणें आपलें अधिकार त्यांस देतां येतात.

## फिन्यान्स (महसूल व खर्च.)

३७. एखादे जिल्हा बोरडास किंवा तालुक बोरडास कोणताही वसूल खर्चाकडे घालतां येत नाहीं. परंतु सर्व वसूल जिल्ह्याचे सरकारी खजिन्यांत जमा होण्या करितां लागलींच पाठविणें त्यांस भाग आहे. व डिस्त्रिक्ट फंडांतून रकम देण्याची ती जिल्हा बोरडचे नांवावर चेक काढून दिली जावी. (पुढें चालूं)

नोटीशीचें उत्तर.

राजुस मर्द सुंदर पाटलीण मोकदम मौजे अकोलखेड हल्लीं मुक्काम बेलुरे तालुके आकोट इस.:—

खालीं सही करणार याजकडून कळविण्यांत येतें कीं, तूं तारीख १९ माहे एप्रील सन १८८८ च्या सज्जनसुखापान पत्रांतून नोटीस दिली ती पावली. तूं आमची लग्नाची बायको आज फारच दिवस तूं घरीं येऊन संसार करीत नाहींस. पद्मासपणा करून खावटी रुपये ३०० मागतेस त्यास तूं घरांतून जाते वेळीं चांदीचें दागिनें व सोन्याचे व रोकड रुपये वगैरे नेलेस त्याचा तपशील खालीं लिहिल्या प्रमाणें.:—

चांदीचे दागिने
तोळे.
४० पायांतील कडे २
३० कांपरवाळ्या जोड १
२० पोलट व पाटल्या मिळून
१० कंठी गळ्यांतील
१९ भरशी व अंगुसदाणा मिळून.
सोन्याचे
तोळे
१ बाळ्या कानांतील
२ नथ
१ मणी व कुरडु मिळून
११९ एकंदर एकशें एकूणवीस.
२०० रुपये रोख.
४० रु. चा पिवळा खंबाईत नेसायचा.

सदरहु लिहिल्या प्रमाणें आमची जिनगी तूं घेऊन जाऊन त्यांतील बासनें विकून खाऊन मागेपाशीं खावटी मागतेस त्यास तूं नोटीस पावल्या पासून आठ दिवसांचे आंत घरी यावें. व न आल्यास रितीप्रमाणें तजवीज केली जाईल कळावें तारख १२ माहे जुलै सन १८८८ इ०

(सही.) सुंदर बलद राणजी
पाटील राहणार आकोलखेड
ता० आकोट जि० आकोलें दस्तुर खुद्द.

## अवश्य वाचा

सर्व लोकांस विनयपूर्वक कळविण्यात येतें कीं खालील नांवाचा कंपनी सर्व प्रकारचा माल मुंबई व पुण्याहून बाहेर गांवी खरेदी करून पाठविण्याचें काम अगर बाहेरगांवाहून आल्यास त्याची विक्री करण्याचे काम कसोशीनें, सचोटीनें व नेमस्त कमिशन घेऊन केलें जाईल.

विक्रीस तयार.

घड्याळें, टाईमपिसेस, पिसेस, क्लॉक्स, शेले, दुर्बिणी, कंपासचे पेट्या, वाद्यांचे पेट्या, सूक्ष्मदर्शक यंत्रें, चित्रें, तसबिरा विलेंचा माल, पुणेशाई पगड्या, विड्या अमेरिकन खरे गारेचे चस्मे, मदनसंजविनी तेल व औषधें वगैरे आहे, प्राईसलिस्ट व ठराव पत्रक मागवा.

मुंबई बायखला पुणें रविवार पेठ

**जी. बी. नाइक आणि कंपनी**

कमिशन एजंट्स व ज. मरचट्स
मुंबई व पुणें

☞ हें पत्र आकोला येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सा० अगर ... ७ ... १।८

किरकोळे अंकास............... ०४

नोटीशीबद्दल.
१० ओळीचे आंत रु० १
पुढें दर ओळीस ०।०६
सरे खेपस.... ...०१

Six Monthly........ 3
Single copy.............

Advertisements
Below 10 lines..
Per line over 10.
Repetition perline


# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR.


VOL XXII — AKOLA MONDAY 23 JULY 1888 — NO. 29

वर्ष २२ — अकोला सोमवार तारीख २३ माहे जुलै सन १८८८ इ० — अंक २९



निःसंशय कायदेशीर.

न भूतो न भविष्यति!

फारच दुर्मिळ संधि!!!

बृहद्राष्ट्रीय शब्दविजिगीषा.

( शब्दांवर बक्षिसें मिळविण्याची चढाओढ. )

मराठींत, इंग्रजीत, गुजराथींत आणि हिंदींत.

बक्षिसांत

रुपये ३५००० चा विनियोग !!!

ह्यांत

नशीबाची परीक्षा नसून अकलेचीच परीक्षा आहे.

सिद्धेन्दुचन्द्रिका

नामक अपूर्व ग्रंथ जो मराठींत, गुजराथींत आणि हिंदी भाषेंत प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे, त्याचे वर्गणीदारांस मात्र ह्या चढाओढींत प्रवेश करितां येईल.

प्रत्येक प्रतीस किंमत.

दोन रुपये.

वर्गणी भरल्या बरोबर बक्षिस चिठी मिळेल. तिच्या आधारें ज्या त्या भाषेंत विजिगीषा (जिंक[illegible] स्पर्धा) करण्यास सांपडेल.

विशेष योजना.

जे गृहस्थ निरनिराळ्या तिन्ही भाषेंतील तीन पुस्तकांस एकदम वर्गणीदार होतील त्यांसच इंग्रजी भाषेंत शब्द तयार करून विजिगीषा करण्याचा हक्क मिळून शिवाय त्या तिन्ही भाषांत ही विजिगीषा करितां येईल.

ह्या तीन प्रतींची किंमत.

फक्त पांच रुपये.

ठेविली आहे.

सर्व खुलासेवार माहिती साठीं प्रास्पेक्टस मागावा.

मेसर्स. जे. भरतिया ॲन्ड ब्रदर्स.

नं० ३८८, फाकलंड रोड, भायखळा.


## पत्रव्यवहार.

ह्या सदरा खालील मजकूर पत्रकर्त्यांच्या मतास मिळूनच असतील असें समजूं नये.

मु० वाशीम ता० १६—७—८८

रा. रा. वऱ्हाडसमाचार कर्ते यांस.

कृतानेक सा० नमस्कार वि. विशेष पावसानें फारच बहार केली. आधींच आमचे येथील हवा हमेश गार असते. व हल्लीं फार वृष्टीमुळें हवेंत अति गारठा येऊन गांवांत जिकडे तिकडे ताप खोकला व शैत्य पित्तापासून वांती, जुलाब व मस्तक दुखणे वगैरे रोगांचा प्रादुर्भाव बराच झाल्याचें दिसतें. परंतु प्रत्येक मनुष्य आपापल्या शरीर प्रकृती बद्दल काळजी वाहतें. सबब रोगांचें प्राबल्य न वाढतां जेव्हांचें तेव्हांच त्यांचें निर्मूल होतें हल्लीं शेतांचें काम उत्तम प्रकारें चाललें आहे. कृषविलांची मुखकमलें प्रफुल्लित आहेत शेतांचा अंकुर चांगला आहे. असाच प्रकार शेवटपर्यंत राहील तर बहुत करून कशाचेंच दैन्य रहाणार नाहीं.

गेला आठवडा मोठ्या मौजेचा गेला. राणी सरकारचे मार्जी लोक प्रिय प्रतिनिधि लॉर्ड रिपन यांनीं लोकांनां अमोलिक देणगी स्थानिक स्वराज्याच्या रूपानें दिली. ती येता येतां आमच्या ह्या जिल्ह्यावर लोकल बोर्ड व जिल्हा बोर्ड या रूपानें चमकूं लागली. लोक नि युक्त सभासद निवडण्या करितां ता० १२—१३—१४ मीनहू रोजीं हजारों लोकांची गर्दी या महत्वाच्या कामा निमित्य सर्व तालुक्यांतून जमली होती. वरून पाऊस तर मी ह्मणतो. वारा तर तोंड बाहेर काढूं देत नव्हता. तरी ह्या देणगीचा उपभोग घेण्या करितां प्रजाशांचीं सर्व दुःखें विसरून लोक मोठ्या आनंदांत होते. व मे० तहसिदार साहेबांच्या कचेरींत आंत बाहेर लोकांची इतकी गर्दी होती कीं, जणू काय एखादी पात्राच भरली आहे. अहो यात्रा ह्मणजे काय लोक समाजच असतो. तसा येथें ही होता. या विषयीं सर्व लोकांनां अपरिचित असा होता तेव्हां त्याचें स्वरूप त्यांचा परिणाम वगैरे चांगल्या रीतीनें लोकांना एकत्र जमवून व्याख्यान रूपानें जर समजविला त्याहून अधीक बारकाईनें समजाविला असतां तर त्या विषयांचें महत्व या अधिक लोकांच्या मनावर अधिक बिंबलें असतें. तथापि मे० तहसिल्दार साहेब यांनीं अति मेहनत घेऊन लोकांनां होईल तितका व समजावितां आला तितका तो समजाऊन दिला. आतां हें वर्ष पहिलेंच असल्यामुळें जितका काल मतें घेण्याच्या कामीं बंदोबस्त पाहिजे होता तितका जरी होतां तरी कित्येक लोकांस कुरकुर करण्यास जागा राहिली असें ह्मणतात. आतां हे कुरकुर करणार लोक आणखी पहिल्यांदा काय मागणार होते कोण जाणें. सदरहू नेमलेल्या दिवसांतून पहिल्या दिवशीं ज्याला जसें फावेल तसें त्यानें कचेरींत जावें. मतें देण्यास अगर मेंबर होण्यास जितके कायदे बार हुकूम लायक त्यांनीं त्या केलेल्या यादींतील इसम पाहून वाटतील त्यांची बारांचीं नांवें कुल द्यावीं व चालतें व्हावें. असा क्रम चालला होता. आमचे इकडे ही रीती पाहल्यांदाच असल्यामुळें येथील व इतर प्रांतांतील निवडण्याचें कामांत फरक किती झाला हें आतांच काढतां आलें नाहीं. परंतु मेंबर जे निवडले जावयाचे त्यांचीं कामें पुढें कोणतीं करावयाचीं. तीं कामें करण्यास विद्वत्तेनें, प्रामाणिकपणानें व आपल्या कुळानें लायक आहेत किंवा नाहींत. या विषयीं निवडणुकीच्या कायद्यांत एखादें कलम आहे किंवा जो कोणी सरकारास चार अगर चारच्यावर रुपये टाऊनफंड देईल तो लायक, इतकीच अट आहे या विषयीं विशेष प्रकाश लोकांच्या मनावर पडला पाहिजे होता कित्येक लोक कायदेशीर फंड देणारे परंतु अक्षर शुन्य व्यवहार ज्ञान शुन्य अशा लोकांस मतें देण्याचा अधिकार असला ह्मणजे जो कोणी त्यांच्या गांवांत मुरब्बी असेल त्यांचेंच भयानें अगर कोणत्या तरी रीतीनें नांव सांगावयाचेंच असा जो एखाद्या खेड्यांत मनुष्य असता तो केवळ अरक असतो. तो जर सदरहू लोका सारखे व्यवहार शुन्य मनुष्य मतें देण्यास निघाले व त्याच्या तर्फे बहू मत पडलें व निवडला गेला, कारण निवडणूक बहु मतानें व्हावयाची तर अशा मनुष्याचे हातून कितपत प्रामाणिकपणानें बोर्डामध्यें कामें होतील व तो आपल्या देशबांधवांची कितपत सेवा करील हें उघड आहे. तेव्हां विद्वत्ता, आचरण वजनदारी, सत्यवादीपणा. व उत्तम कुलशील व निरपेक्ष बुद्धी हे गुण ज्याचे अंगीं असतील व ह्या त्याच्या अंगाच्या गुणा विषयीं सरकारची खातरी होईल तरच तो बोर्डांत काम करण्यास लायक आहे असें समजलें जाईल अशा विषयीं कांहीं अट आहे कीं नाहीं कोण जाणें. नाहीं तर हा कपिलाषष्ठीचा योग येऊन आपमतलबी जर एखादा निवडला गेला तर कामें नीट न होऊन नेटीव काम करण्यास नालायक असें दिसून येईल व ही जरी प्रथम दर्शनी देणगी लहान दिसते तरी ह्या पासून नेटिवांची मोठी योग्यता ठरल्यास ती फार मोठी आहे, तेव्हां ती लहान आहे असें ह्मणतां येत नाहीं. तव्हां मतें देणारांनीं योग्य मनुष्यालाच दिली पाहिजेत. भिडेनें अगर एकाद्या व्यक्तीच्या नोकळ दाबानें मागें पुढें न पहातां सरळ व हिताचा पंथ पत्करला पाहिजे. नाहीं तर सर्व ओं फस होईल. असो. सध्या ह्या विषयीं पुरे करितो. झालेल्या निवडणुकीचा निकाल अजून बाहेर आलेला नाहीं तेव्हां तेव्हां गुणीजन मेंबर निवडले गेले किंवा कसें याचा अंदाज करितां येत नाहीं. समजल्यावर प्रत्येक व्यक्ती विषयीं योग्यायोग्य विचार सवडीनुसार केला जाईल.

ता. १२ मिनहू रोजीं येथें रा. रा. पांडुरंग गोविंद प्रसिद्ध वकील राहणार अकोलें यांची स्वारी बरकरांचे मुकदम्या निमित्य येथें आली होती. त्यांनीं त्याच दिवशीं सायंकाळीं श्री बाबासाहेबांचे भव्य मंदिराच्या पुढील भागांत उघड्या फरशीवर बोर्डा संबंधीं थोडेंसे व हिंदुस्थानांत गाजत असलेल्या राष्ट्रीय सभे संबंधीं भाषण केलें. सुमारें तीन चारशे लहान मोठ्या लोकांचा समाज जमला होता. शेट सावकार लहान मोठे सरकारी कामदार (फार मोठे नव्हते हो) मुलें वगैरे श्रोते होते. सदरहू वकील साहेब सर्वांच्या मध्यें उभे राहून उपदेशका प्रमाणें देश हिताच्या खऱ्या कळकळीनें व प्रेमळ बुद्धीनें सुमारें एक तासभर भाषण करीत होते. भाषण फार मनोवेधक विषय प्रतिपादनाची शैली फारच उत्तम. असें लोक हिताच्या कार्यी झटणारे मानापमान न पहातां ज्यांचें ब्रीद केवळ सामाजिक हिताच्या कामीं अविश्रांत मेहेनत करावयाची व ज्यांना नांव लोकांकाची गोडी असे मातृजननी पृथ्वीची सेवा करणारे लोक आपल्या अकोल्या कडे कसें उत्पन्न होतात याचें आह्मांस रात्रंदिवस आश्चर्य वाटतें. असे लोक आमचे इकडे कां उत्पन्न होत नाहींत कोण जाणें. इकडील हवा थंड सबब असा प्रकार होतो ह्मणावें तर आपल्या स्वहिताविषयीं तत्पर असे कसे लोक निपजतात. असो, बाहेर लोक निपजतात. यांचें हें वळण पाहून या पुढें तरी लागत होतील तर पहावें.

सदर्हू गृहस्थांनीं राष्ट्रीय सभे संबंधीं विवेचन केलें. ते ह्मणाले ही सभा देशाच्या हिता करितां विद्वान् लोकांनीं स्थापिलेली आहे. ह्या सभेचे उद्देश पराय वसन वगैरे सर्व सांगितलें दिवसानुदिवस ह्या सभेचा विजय होत चालला आहे हे देशाचे पुढील अभ्युदयाचें सुचिन्हच आहे. ह्या सभा रुपी वृक्षाचें बिजारोपण करून तीन चार वर्षे झालीं. अंकुर फार चांगला आहे. मात्र नियंत्यांनीं मध्यें त्या अंकुराला कीड वगैरे न लागेल अशा विषयीं जपलें पाहिजे. हा विषय सार्वजनिक असल्या कारणानें याची समजूत सर्व जातीच्या सर्व प्रतीच्या लोकांनां करून देण्या करितां पुढारि मंडळीनें श्रम केले पाहिजेत. अडाणी लोकांनां जरी ह्या सभेचें महत्व कळत नाहीं व कित्येक ह्या देशांतील लोकच ह्या सभेच्या विरुद्ध ओरड करितात तरी कालांतरानें सर्व विघ्नें दूर होतील. त्यांचें सर्व भाषण येथें देण्यास सवड नाहीं. नंतर येथलि कित्येक लोकांची त्यांनीं कमेटी नेमिली त्यांत येथील वकील मंडळ आहे. तेच काय ते हात पाय हालविण्या सारखे आहेत बाकीचे त्यांस मदत करितील तर ही मंडळी बहार करून देईल हे विनंती.

आपला प्रेमेच्छुचा धाकटा बंधु
"क्ष"

---

वऱ्हाडसमाचार.

---

मित्ती आषाढ शुद्ध १९ शके १८१०.

## हिंदुस्थानचा अभ्युदय.

( नीचैर्गच्छत्युपरि च दशा
चक्रनेमिक्रमेण. )

हिंदुस्थानांत 'राष्ट्रीय सभे' ची स्थापना झाली हा लोकमताचा भक्कम पाया होय. लोकमताला बळकटी व मजबुती येत जाईल तसतशी त्यावर रचलेली राज्यव्यवस्थेची भव्य इमारत किती अनुपमेय व [illegible]त बनेल याची कल्पना इंग्लंडांतील किंवा युनायटेट स्टेट मधील पार्लमेंटचें चित्र मना पुढें उभें केल्यास थोडी बहुत होण्या सारखी आहे. लोकमत ह्मणजे कोणती अजब शक्ति आहे आणि त्याचे कितपत प्राबल्य असतें याच्या प्रत्यंतरासाठीं उभय देशांतील राजनीति प्रत्यक्ष साक्ष देत आहेत. शतकानुशतकें लोटलीं तरी हिंदुस्थान देश अद्याप परसत्तेच्या चक्रा खालीं चुरडून गेला आहे. 'बळी तो कानपिळी' हा न्याय सर्वत्र लागूं होत असे आणि त्यामुळें खरोखरच्या लोकमताला अनुसरणाऱ्या राज्यव्यवस्थेचा आमच्या देशास बिलकुल अनुभव नाहीं. परंतु इंग्रजसरकारच्या हातीं हें हिंदुस्थानचें अवाढव्य राज्य आल्या पासून गेल्या पंचवीस तीस वर्षांत आमच्या उदार व न्यायमूर्ति राज्यकर्त्यांच्या छत्रा खालीं आह्मी प्रजावर्गानें कालक्षेप करूं लागल्यामुळें आह्मांस विद्यामृत पान करण्यास मिळूं लागलें आहे असें प्रतिपादन करणाऱ्या राजनिष्ठ लोकांच्या मता प्रमाणें ह्मणा किंवा सुखावह व सौम्य इंग्रजी अंमला पासून आमच्या झोंपलेल्या नैसर्गिक प्रवृत्तिविद्येच्या पुनरुज्जीवनानें आणि देशाच्या अव्याहत अबाधानीनें पूर्ववत् अनेक राज्य प्रकरणीं वळूं लागल्यामुळें ह्मणा पण प्रस्तुतच्या राज्य कर्त्यांच्या अंमला खालीं आह्मांस थोडथोडा स्वराज्याचा उपभोग मिळण्याचा काल समीप येत चालला आहे ही गोष्ट विशेष आनंद मानण्या सारखी आहे.

राष्ट्रिय सभेविषयीं किंवा समाज ही संज्ञा पडेल अशा अन्य कोणत्याहि जनसमूहाविषयीं लोक काय बोलतात या संबंधानें विचार करून पहातां आढळून येईल कीं समाजाचे उद्देश चांगलें असोत किंवा वाईट असोत त्या समाजांतील आणि त्या समाजा बाहेरील निरनिराळ्या वर्गांतील लोकांचीं मतें नेहमी थोड्या बहुत फेरफारानें भिन्न भिन्न पडतात आणि यामुळें सामाजिक समुदायामध्यें पक्ष प्रतिपक्ष होऊन त्या समाजाची पूर्व संकल्पा प्रमाणें रचना कायम राहील किंवा नाहीं अशी ही कित्येक प्रसंगीं भीति पडते. राष्ट्रीय सभेविषयीं अद्याप असा प्रकार नाहीं असें खात्रीनें तरी ह्मणतां येणार नाहीं. ह्या प्रतीस्पर्धे पासून सभेचे समूळ विसर्जन होणार नाहीं अशी बळकट आशा आहे. राष्ट्रीय सभेचें पाऊल उत्तरोत्तर पुढें पडत आहे त्या मानानें लोकमताचें महत्व लोकांस पुर्तेपणीं कळून येत आहे आणि लोकमतास एका प्रकारें स्थैर्य येत आहे. अलीकडे नेटिवांतील विद्वान नीतिनिपुण व व्यवहार कुशल पुढारी मंडळीस स्वदेशाच्या राज्यकारभारांत हक्क व अधिकार सरकारापाशीं मागण्यास दिवसें दिवस उत्तेजन मिळत आहे. तेव्हां हिंदुस्थानांत इंग्लिशांचें राज्य चिरायु राहणार नाहीं, इंग्रजी राज्य फार अशाश्वत व क्षणभंगुर होत आहे, व कांहीं वर्षांनीं 'राष्ट्रीय सभा' ही एक प्रचंड शक्ति नेटिवास मिळण्याचा संभव आहे अशीं अर्वाचे सध्यां पुष्कळ उद्गार बाहेर निघूं लागले आहेत आणि कांहीं युरोपियन व आंग्लोइंडियन व्यक्तींचा तर कृतनिश्चय दिसतो कीं 'राष्ट्रीय सभा' झटली ह्मणजे निवळ थोतांड आहे आणि हिंदुस्थानांत शिक्षणाचा अशा कामीं दुरुपयोग करण्याचा शिकलेल्या लोकांचा बेत आहे व त्यापासून ते स्वतःचें महात्म वाढविण्यास पहात आहेत. असा सरसकट शेरा ठोकून यथाशक्ति ह्या सभेस विघ्नें आणावीं आणि तिचा ऱ्हास होईल त्या रीतीनें युक्त्या लढवाव्या. ह्या विघ्नसंतोषी मंडळी शिवाय हिंदु सर सय्यद अहमद व मुसलमान सर सय्यद अहमद कांहीं कमी नाहींत. इंग्रज लोक केवढे बलिष्ठ, राज्य व्यवस्थेचा गाडा केवढा प्रचंड त्यांचे ज्ञान व अधिकार किती मोठा, ह्या गोष्टी मनांत न आणून तुह्मी पोरासोरांनीं काय ह्या चळवळी आरंभल्या आहेत? काय हा पोरखेळ आहे! अशा गोष्टी निराळ्याच रीतीनें होत असतात. त्या अर्जीनें किंवा सभेनें होत नसतात. त्याला मनुष्यबळ पाहिजे. मोठा अधिकार पाहिजे.' अशा प्रकारचे त्यांचे विचार असतात. राष्ट्रीय सभेचें काम कांहीं वर्षें सुरळीत चाललें तर इंग्रज सरकारास हिंदुस्थानच्या राजनीतींत पुष्कळ बदल केला पाहिजे ह्मणजे तेणेकरून इंडियांतील भिन्न भिन्न धर्माची व जातीची प्रजा सारखी राजीखुषी राहील आणि नेटिवांच्या आशयानुरूप लोकांचें हक्क सरकार मानूं लागले ह्मणजे विद्वन्मंडळाचे मनोरथ सिद्धीस जातील. वर निर्दिष्ट केलेल्या उभय प्रकारच्या लोकांच्या मतें राष्ट्रीय सभेचें खरें स्वरूप सांगून समाधान करावें आणि सरकारची राष्ट्रीय सभेच्या संबधानें कोणत्या पर्यायानीं मदत पाहिजे आहे व त्यासाठीं त्यांनीं साधारणपणें राज्यव्यवस्थेंत कोणती दिशा धरावी हे उघड करून दाखवावी एतदर्थ राष्ट्रीय सभेची साद्यंत पण संक्षिप्त हकीकत आह्मी देत आहों.

हिंदुस्थानांत राष्ट्रीय सभा स्थापित होऊन आज तीन वर्षे होऊन गेलीं आणि तिची तिसऱ्या वर्षाची सभा मद्रासेस भरली होती. ह्या मद्रासच्या सभेंत पहिल्या दोन वर्षांपेक्षां गेल्या सालीं तिचे मूळ उद्देश, कोणकोणते आहेत, तिची चालू व्यवस्था कशी काय आहे व तिच्या प्रस्तुतच्या स्वरूपावरून भावी स्थितीची काय अटकळ करितां येईल इत्यादी अनेक गोष्टींचा चांगल्या प्रकारें उहापोह झाला आहे आणि मद्रासच्या सभेपासून तिची केवढी मातबरी आहे. व तिच्या अंगीं कोणते कर्तृत्व आहे याची कल्पना थोडीबहुत लोकांनां नुकतीशी होऊं लागली आहे. राष्ट्रीय सभे विषयीं लोकांचे विचार अनुकूळ असोत किंवा प्रतिकूळ असोत त्या संबंधानें आमचे कांहीं एक ह्मणणें नाहीं पण तिच्या बद्दल बरीवाईट मतें प्रगट करण्यापूर्वीं सभेची मूळपीठिका लक्षांत वागवून व साधकबाधक प्रमाणें समन्याय दृष्टीनें मनांत तोलून नंतर राष्ट्रीय सभेविषयीं आपापले कायमचे विचार ठरविल्यास उभयपक्षांच्या प्रतिस्पर्धे पासून एकंदरींत या सभेचें प्रत्यक्षरीत्या किंवा अप्रत्यक्षरीत्या हित होण्याचा पुष्कळ संभव आहे. राष्ट्रीय सभेसारख्या समाजशाकटामध्यें सहेतुक मतभेद असणें आह्मांस पाहिजे आहे कारण त्यामुळें नानाविध लोकांची संमति असेल अशा गोष्टी अनेक राष्ट्रीय सभेपासून निष्पन्न होतील. चार लोक एकत्र जमून एखाद्या सार्वजनिक कामाचा विचार करितात त्यास्थळीं पक्ष प्रतिपक्ष असल्यानें अर्धवट विचारानें होणारे प्रकार सहसा घडून येत नाहींत आणि सर्वांस हितावह अशा मध्यम नियमाचे अवलंबन होत असतें. विचारी पुरुषांची टुकडी असल्यानें कोणते ही प्रकरणांत साधकबाधक गोष्टी पाहणें खुषीवर न राहतां अत्यावश्यक होत असतें आणि त्यामुळें सर्व साधारण अशा परिणामी राजमार्ग पतकरावा लागतो. लोकमान्य मार्ग स्वीकारला असतां समाजाच्या कृत्रीम रचनेंत विपर्यास येत नाहींत आणि समाजाच्या पूर्व संस्थेची अनवस्थिती न झाल्यामुळें समाज यावच्चंद्रदिवाकरी सुयंत्र चालण्याचा संभव असतो.

'राष्ट्रीय सभेत' हिंदुस्थानांतील कुलीन गर्भश्रीमान् विद्वान् व राज्याधिकारसंपन्न अशी शिष्ट शिष्ट मंडळी आहेत असें प्रतिपादन करिते वेळीं मद्रासच्या सभेचें अध्यक्ष मि. बद्रुद्दीन तय्यबजी ह्मणाले कीं "हिंदुस्थानांतील महाराणी सरकारच्या पंचवीस कोटि प्रजेमध्यें सुशिक्षित नेटीव लोकाशिवाय अधिकाधिक राजनिष्ठ आणि स्वामीभक्त स्नेही ब्रिटिश सरकारास अन्य कोणते मिळणार आहेत? ब्रिटिश सरकारच्या सरळ व निष्कपट स्नेहाचें लक्षण हें आहे कीं त्यांस या सरकारनें आह्मांवर जो अनुग्रह केला आहे त्याची खरी योग्यता कळली पाहिजे; आणि या अनुग्रहाचें खरें मर्मज्ञ दुसरें कोण आहेत- अज्ञानी शेतकरी किंवा सुशिक्षित नेटिव लोक? ईश्वर करो आणि तसा प्रसंग न येवो पण राशिया व ग्रेटब्रिटन या उभय राष्ट्रांमध्यें या देशांत वर्चस्व मिळण्याबद्दल रणसंग्राम माजला तर या दोन्ही राष्ट्रांच्या सार्वभौमत्वाच्या गुणावगुणांची परीक्षा करणारे अन्य गुणग्राही कोणते आहेत? हे अन्य लोक शिकलेले नेटिव लोकच आहेत. हे नेटिव लोकच उत्तम प्रकारें खरे गुणग्राही व मर्मज्ञ आहेत कारण आपण सर्वजण हें सर्व समजतों आणि खरी खरी किंमत करितों ह्या नेटिव लोकांस इंग्रजी राज्यांत सभेचें हक्क, बोलण्याची चालण्याची मोकळीक असे अनेक लाभ होत आहेत त्याची वास्तविक योग्यता कळते; उलटपक्षीं फार फार करून ह्या लाभांचा लवलेश ही रशियाच्या राज्यांत आपणास मिळणार नाहीं परंतु उद्धट व जुलमी अंमल आपणावर येईल. ह्या बादशाहाचें बडें वैभव ह्मटलें ह्मणजे सैन्याची बलवत्तर परीमिति, आसपासच्या प्रजेवर जबरदस्तीचे हल्ले आणि मोठमोठे पराक्रम हीं होतील बरें. आमचे प्रतिस्पर्धी वाटेल तें ह्मणोत पण आपण शिकलेले नेटिव लोक आमच्या विद्वत्तेच्या सामर्थ्यानें सुधारलेल्या व ज्ञानसंपन्न सरकारच्या अनुपम अनुग्रहाचे खरे खरे आमचे आह्मीच पुरे मोक्ते आहों आणि अर्थात आमच्या कल्याणार्थ हिंदुस्थानांतील ब्रिटिश सरकारचे अति भक्कम आणि पक्के आह्मी आधारस्तंभ आहों." ह्या इंग्रजींतल्या भाषणाच्या मराठी उताऱ्यावरून 'राष्ट्रीय सभे'ची दिशा कोणती आहे हें सहजगत्या कळून येईल. इंग्रजांच्या राज्यांत 'राष्ट्रीय सभे'ची उभारणी झाली आहे आणि त्याच निर्वाणच्या छत्रा खालीं 'राष्ट्रीय सभा' शाश्वत राहील.

पुढें चालू

---

दक्षिण महाराष्ट्रांतील रेव्हिन्यु सेटलमेंट कमिशनर मि. ए. टी. क्राफर्ड यांस कांहीं वहिमा वरून सस्पेंड केलें आहे, साहेबां बरोबर दोन मामलेदारांसही सस्पेंड केलें आहे. आणखी सुमारे ८० असामिस सस्पेंडाचे हुकूम जाणार आहेत असें ह्मणतात. ह्या निमित्त पुण्यांतील एका बड्या जहागिरदारांस वारंटानें पकडून वीस हजारांच्या जामीनावर सुटें सोडलें आहे. मि. क्राफर्ड यांनीं पलायन करण्याचा व्यर्थ प्रयत्न केला आणि स्वतांस अगोदरच दोषी ठरवून घेतलें. पुण्याहून पळ काढते वेळीं साहेबांनीं वेष पालटला, कृत्रिम दाढी लाविली आणि रेलवेच्या तिसऱ्या क्लासानें कल्याण पर्यंत प्रवास केला. तारायंत्र द्वारें मुंबईच्या पोलिसास ह्या सर्व बातम्या गुप्तपणें कळवीत असत त्यामुळें मुंबईचे पोलीस अधिकारी हुशार झाले होते. साहेब कल्याणहून ठाण्या पर्यंत एका भिकार होडीनें खाडींतून जाणार होते पण पुढें त्यांचा बेत बदलला. कल्याणहून भायखळ्या पर्यंत दुसऱ्या क्लासानें गेले. साहेबांनीं आपलें नांव एस्. जेम्स ठेविलें आणि जबलपूर मेलनें

ject. The portion of that Resolution embodying the views of Government on Technical Education is rather interesting at this juncture when the attention of the public has been drawn to that subject. We therefore quote it below for the benefit of our readers:—

It would seem necessary to begin with industries which are in some degrees centralized, which are growing into importance with the new growth of trade and manufactures, and which are capable of improvement by aplication of scientific principles to materials and processes. At the centre of such industries a technical school will be useful. To great railway workshops and factories may, with undoubtedly great advantage, be attached schools of drawing and design and of practical instruction in scientific principles of handicrafts there carried on; and probably in large stations and municipal towns there will be a demand which will repay those who acquire in local industrial schools superior skill. The subject is of such extreme importance and the insignificance of what has been attempted in India is so conspicuous, that the Governor-General in Council is deeply impressed with the necessity for action in whatever way may be practicable and sound. Some local Governments have, indeed, recently taken practical measures to promote technical education, and these measures have been viewed with much satisfaction by the Government of India; but, as it is desirable that steps best calculated to promote technical education should form a subject of continuous enquiry and discussion the Governor-General in Council suggests that local Governments and Administrations should on a convenient but early opportunity take action in two ways. Impressed with the existing want of information at hand as to the extent, character, and circumstances of important local industries in every province of India, his Excellency in Council would, in the first place, suggest that in each province an industrial survey should be completed. In the second place he would recommend that, with a view to turning the knowledge acquired by such survey to the best account in the light of abundant information contained in the report of the Royal Commission on Technical Education, each Governor and administration should from a committee of educational experts and professional men, who should make suggestions from time to time for auxiliary supply of appropriate means of technical education, and for such modifications of a state system of public instruction as may aid and encourage industries and industrrial employment up to the full measure of such requirement at each provincial centre as may be found to exist, and, when the circumstances are opportune, for the establishment of a technological institute for enlargement of provincial schools of art and design and for larger co-operation of the University in the promotion of the object in view.

The Government of India suggests action in two ways—first a survey of existing local industries in each province and secondly an appointment of influential Committees for making useful suggestions to Government for promotion of Technical Education. This is all very good for a centralized Government: but it would probably take some ye[illegible] before the various Local Governm[illegible] are able to take action in the light o[illegible] Government resolution. We have often observed that this province is specially adapted to technical industries and that people of this province stand equally in need of technical education as the people of other provinces. Although it is true that artistic excellence has been acquired by many men doing handicrafts, still it is difficult to find workmen who possess the requisite knowledge of the *theory* of work. And the generality of the socalled carpenters and smiths can hardly use the plumbline or the right angle. We often see pillars placed awry and wall not quite perpendicular. The public would gain a decided bene fit even if an ordinary carpenter's and smith's class be established. A system of licences to duly qualified smiths and carpenters is not in vogue here nor is the skill of workmen ensured by trade-guilds and apprenticeships as in European countries and hence the want of skill. But this want of skill can be remedied as we have said above by the establishment of classes to teach those crafts. This is however, what the people can do even by the useless. But in the introduction of complicated mechanical arts and refined machinery the help of the state is all essential. No system of government can, it is true make the people of this country acquire technical industries if the people are not willing to help themselves. But although State intervention in each and every matter affecting the weal of subjects is not a remedy sure and certain to do away with existing evil, still, we believe that in matters like these the Government will have to make an initial move. The successful outcome of any scheme must of course depend on the degree of carefulness and solicitude with which people interest themselves in it. In Berar the Government can do well to open a workshop on a small scale where people could learn the use of machinery. The resolution refers to the appointment of a committee for proposing modifications, among other things of a system of *State* education; thus clearly realizing the consciousness of Government of its duty in the matter. And any system of *State* education, technical or otherwise must naturally in the present state of affairs, be more confided in by the public. It therefore behoves our local Government to pay their early attention to the subject, as well for carrying out the object of the Resolution as for doing substantial good to the people of this province.

---

A certain Bengalee Moonsiff while delivering judgment in a certain case is stated to have remarked that "99 percent of the Hindu widows are unchaste." This is a too sweeping assertion which any man, much less a judicial official should have hesitated to indulge in. But may we ask how this model Moonsiff got hold of this precious bit of statistical information? How many widows does he personally know? Are ninety-nine percent of the widows known to him, unchaste? Even then it does not follow that ninety-nine percent. of Hindu widows are unchaste. It only shows that the Moonsiff is happy in the possession of a circle of widow acquaintances ninety nine percent of whom are unchaste. This is a curious thing. We wonder whether it is *he* who seeks the widows, or the widows seek him, to furnish proofs of his grand discovery! What a terrible hue and cry would have been raised if an English official had so described the widow-hood of Hindustan?

---

Official Patronage in Mysore.—Not long ago a Eurasian applied for a post in the Excise Department of the Mysore State and his application was in due course forwarded to the Dewan for his decision. The latter, however, refused to sanction the appointment as he thought that a native youth equally fitted to do the work, could be [illegible] on a much lower rate of pay. He went on to point out that it was undesirable to import Europeans and Eurasians for posts for which qualified natives were available. This order of the Dewan has given great umbrage to the *Madras Standard* but we have no hesitation in saying that the Dewan has acted justly in the matter.

---

## वऱ्हाड.

हवामानः— ह्या आठवड्यांत ह्मणण्यासा रखा विशेष पाऊस पडला नाहीं. तथापि पावसाच्या मधून मधून सरी पडतच होत्या. मध्यंतरी उघाडी व रीच सांपडल्यामुळें शेतकरी लोकांचीं कामें फार सुरळीतपणें चाललीं. पिकें उत्तम आहेत. ताप, खोकला ह्या शिवाय विशेष रोगराई कांहीं नाहीं.

वऱ्हाडांत १८८७ सालीं २०१ मनुष्यें व १७२३ जनावरें हिंसक जनावरांकडून व सर्प दंशानें प्राणास मुकलीं १८८६ साला पेक्षां ९ ज्यास्ती मनुष्यांची व १४० जनावरांची प्राणाहुती झाली. ह्या वर्षी २१९ हिंसक जनावरें व १९७ सर्प मारले गेले. ह्या वर्षी १८१० लोकांस हिंसक प्राण्यांचा नाश करण्यासाठीं हत्यारांचे परवाने मिळाले अशाच रितीनें जर दरवर्षीं अधिक परवाने मिळत जातील तर हिंसक जनावरांच्या जबड्यांतून बरेच प्राणी वांचतील अशी आशा आहे. ह्या वर्षी ३१४७ रुपये ह्या प्राण्यांच्या नाशा करितां खर्ची पडले.

येथील वर्षोत्सव व्याख्यानमाळे प्रमाणेंच उमरावतीस ही एक व्याख्यानमाला सुरू झाली. अशा तऱ्हेचे उत्सव हे वऱ्हाडात प्रथम चेच आहेत करितां हे असेंच पुढें भरभराटीस येऊन चिरायु होवोत असें आह्मी इच्छितो.

मे० कर्नल स्पेनूस्की सा० आ० क० यांची स्वारी येथें गेल्याचे मागील रविवारी आली. साहेब बहादुरांचा मुक्काम येथें मिवान १।१२० दिवस पर्यंत होईल असें समजतें.

मे० कर्नल मेकंझी साहेब ज्यु० कमिशनर यांस अजमीरचे अॅक्टिंग कमिशनरचे जागीं तीन महिने पर्यंत नेमले कर्नल साहेब पुन्हा वऱ्हाडांत येतील असें वाटत नाहीं कारण त्यास बाहेरच कोठें तरी लवकरच बढतीची जागा मिळेल असें ह्मणतात.

मे० कर्नल मेकंझी साहेब हे आपले नवीन मिळालेले जागीं गेल्यावर त्यांचे येथील अ० ज्यु० कमिशनरचे जागेवर बहुत करून मे० कर्नल बुलक साहेब यांचीच नेमणूक होईल असें दिसतें.

मे० मॅकागील साहेब यांस बुलढाणें येथें आ० डि० पोलीस सुपरिनटेंडेंट नेमले व त्यां प्रमाणें त्यांनीं आपले कामाचा च्यार्ज ही घेतला.

मे० राइटसाहेब अ० इ० ज० आफ पोलिस यांची स्वारी तपासणी करितां येथें आली आहे.

सर लिंपलग्रीफिन हे इंडियांत येणार. यांनीं हैदराबाद येथील रेसिडेंटची जागा कबूल केली असें ह्मणतात.

यंदाचा "वऱ्हाड हायस्कूल माजि विद्यार्थी समाज" उमरावतीस भरणार आहे.

मि० सितळसिंग ना. तहशिलदार यांच्या मरणामुळें रिकामी झालेल्या जाग्यावर रा. रा. बिनायक भपाजी काने जिल्हे नाझर एवतमाळ यांची नेमणूक झाली असें ह्मणतात.

---

### नोटीस.

ती॥ रा० दत्तु वल्लद आनाजी तेली हा० मुक्काम आकोलें यासी कळविणार मिठाराम वल्लद किसन अ० पा० मा० राधा व आजी भोनाई तर्फे कुलमुखत्यार मारुती परशराम कळवितों कीं आपसामध्यें जी इस्टेट असेल ती सर्व निमे निमे हुकुमनाम्यांतील ठरावा प्रमाणें वाटून घेण्याचें ठरलें असून आज पावेतों तुम्ही ज्याचे मार्फत वाटणी करण्याचे ठरलें त्या लोकांकडे हजर न राहिल्या मुळें हरकत होऊन व पूर्वीं ही तुम्ही लोकांस हरकती केल्या मुळें त्यांनीं दस्ता ऐवज वगैरे करून दिले नाहीं. या सबबीमुळें नुकसान झालें आहे. तें सर्व तुम्हास सोसावें लागेल व आज पासून हजर राहून वाटणी करून घेतल्या शिवाय तुह्मी येथून जाऊं नये. सदरहु प्रमाणें न केल्यास तें पुढें आणखी ही नुकसान होईल त्याची सर्व प्रकारें जबाबदारी तुमचेवर राहील. कळवें तारीख २८—७—८८ इसवी.

(सही.)

तर्फे कुलमुखत्यार मारुती परशराम नाइकवाडी दस्तुर खुद्द.

---

### नोटीस.

भोम्या वल्लद गोविंदा अडनांव चव्हाण रहाणार कोलत तालुके जळगांव जिल्हा अकोला यांस नोटीस देणार पुंजी मर्द भोम्या नोटिशीनें असें कळवितों कीं, तुझ्याशीं माझें लग्न होऊन आदमासें १०—११ वर्षें जाहली, अलीकडे चार वर्षांत मी शहाणी झालीं व माझ्या बापानें तुझ्या घरीं आणून स्वाधीन केलें. असें असतां तूं विनाकारण मज बरोबर तंटा करून मजला बापाचें घरीं आज बरींच वर्षें ठेविलीस. आतां माझ्या बद्दल माझे बापास कोणी कर्ज देत नाहीं. आज पावेतों सहा वर्षांत कर्ज काढून तुझे नांवावर निर्वाह केला. आतां तूं मजला ही नोटीस पावल्या पासून पंधरा दिवसाचे आंत तुह्मी मजला खावटीचे रुपये १०० देऊन चार जातभाई पंच यांची खातरी करून मजला घेऊन जावें असें न केल्यास मी खावटी बद्दल फिर्याद करून रुपये घेईन. व हीच सोडचिठ्ठी समजून दुसरा घरठाव करीन मग कोणचेही प्रकारचा हक्क मजवर तुझा नाहीं ह्मणून दिली नोटीस कळावें. ता० २९ माहे जुलै सन १८८८ इ०

(सही)

पुंजाई मर्द भोमाजी हिची हातची बांगडी असे.

---

## वर्तमानसार.

हैदराबादचे दिवाण साहेब लार्ड डफरिन सा० याच्या भेटीकरितां सिमल्यास गेले आहेत. बरोबर कर्नल मार्शल, कर्नल लडलो व मि० फरदुनजी वगैरे मंडळी गेली आहे.

कुत्रा किंवा कोल्हा पिसाळतो कशानें याची माहिती कोणी कळवील काय? मृत पशूवर गिधाड बसून त्या पक्षाची विष्टा त्या पशूचे अस्थीवर पडली आणि तीच अस्थी कुत्रा किंवा कोल्हा यांच्या चघळण्यांत आली तरं ती पिसाळतात असें वृद्ध माहितीवरून कळतें. शास्त्रीय शोधन करून उपायासह यांतील तथ्य कळेल तर बरें.

बांबू ( कळकी ) च्या झाडांस फुलवरा आला असतां हटकून दुष्काळ पडतो असा लोकांचा समज आहे. ते कांहीं ही असो, पण असा फुलवरा पुष्कळ वर्षांनीं क्वचित् येत असतो खरा आणि तो आला ह्मणजे त्यापासून तांदुळाचे दाण्याहून किंचित् मोठे व दिसण्यांत सुरेख असें धान्य उत्पन्न होतें.

हें धान्य पुष्कळ उत्पन्न करण्याची जर शोधपूर्वक खटपट झाली, तर त्या पासून धान्य हारी लोकांच्या भक्ष्य पदार्थांस एक जास्त भर पडल्या सारखे होईल, असें कित्येकांचें ह्मणणें आहे.

नुकत्या संपलेल्या दशहाराविषयीं लोकांची समजूत अशी आहे कीं, त्या दिवसांत पाऊस पडला नाहीं तर सर्पांची उत्पत्ति फार होते. सर्पांचें आंडीं घालून पिलें उत्पन्न करण्याचे याच सुमारास दिवस असतात. ते आंडीं बहुधा सुक्या जमिनीवर घालून त्यांजवर बसून तीं उबवितात. पु० बे०

राजीनामा दिला— रा० ब० महादेव गोविंद रानडे यांचे बंधु रा० रा० नीळकंठ गोविंद रानडे यांस लष्करांत कमिशन्ड आफिसराची जागा सरकारनें दिली होती. ते जमादार झाले होते. परंतु त्या जागेचा राजीनामा देण्यास त्यास परवानगी दिली असें परवां आली सरकारी ग्याझिटांत वाचलें. राजी नाम्याचें कारण समजलें नाहीं.

पार्शीव्हाइस कान्सल— मि० हार्मसजी एदलजी यांस युनायटेड स्टेट्स सरकारच्या मुंबई येथील व्हाईस कान्सलची जागा मिळाली. गोऱ्या सरकारचा व्हाईस कान्सल आजपर्यंत नेटिव कोणीच नव्हता.

सिंगापूरचा थोरपणा— ता० १ जुलई पासून सिंगापूर हद्दींत प्रसिद्ध होणारीं वर्तमानपत्रें सिंगापूर हद्दींत व सिंगापूर सरकारच्या संरक्षणा खालीं असणाऱ्या नेटिव संस्थानांत पाठविलीं तरी त्यांवर हांशील घेऊं नये. असा उदार मनाचा, ज्ञान प्रसारास उत्तेजन देणारा व स्वतेस फायदेशीर ठराव सिंगापूर सरकारानें केला आहे. हें ऐकून त्या सरकारच्या औदार्याविषयीं व थोर मनाबद्दल कोणास बरें समाधान होणार नाहीं! आस्ट्रेलियन वसाहतींतल्या सरकारानें असाच प्रकार आज कित्येक वर्षें चालूं केला आहे. ही गोष्ट आमच्या वाचकांस आह्मी कित्येक वेळ कळविली आहे. सिंगापुर ही ब्रिटिश राष्ट्राची एक वसाहत आहे. व वसाहती संबंधानें ब्रिटिश राष्ट्राच्या खासगत पिशवीस कैकवेळां खार लागती ही गोष्ट येथें सांगणें अवश्य आहे. हिंदुस्थानांत प्रसिद्ध होणाऱ्या पत्रांस असाच उदार मनाचा ठराव लागूं करावा अशाबद्दल पोष्ट खात्याच्या व सरकारच्या कानीं कपाळीं कित्येक वर्षें वर्तमानपत्रकर्ते ओरडत आहेत पण त्याचा कांहीं उपयोग होत नाहीं. हिंदुस्थानच्या पासंगास ही लागावयाचे नाहीं अशा सिंगापूर सरकारनें असा उदार बुद्धाचा ठराव करावा व तो आमलांत आणावा, आणि त्याबद्दल आमच्या सरकारास कांहींच वाटूं नये हा मोठाच चमत्कार नव्हें काय? स्वतां नाहींतर नाहीं, शेजाऱ्यापाजाऱ्याचें पाहून तरी आमच्या सरकारास दुरूप यावी कीं नाहीं? शु० सू०

तंट्याभील हा अगदीं आपले लुटारू टोळीसह होळकर पोलीस समोरून पळून गेला. व जातां जातां त्यानें एके पोलीस कान्स्टेबलचें नाक कापून नेलें.

विलक्षण सुवर्ण पत्रिका—श्री क्षेत्र काशी येथें श्री विश्वेश्वराचे देवळा नजीक नुकतीच एक सुवर्ण पत्रिका आकाशांतून पडली. त्यांतील मजकूर अशा अर्थाचा आहे. “१८८८ चे नोव्हेंबर महिन्या पासून ईश्वर हिंदुस्थावर राज्य करण्या करितां स्वतः मनुष्य रूपानें अवतरणार आहे. त्या महिन्या पासून सर्व मनुष्यें न्यायानें वागूं लागतील. दिवसाचें मान वाढत जाईल, ह्मणजे १४ तासांचा दिवस दिवस होईल. रात्र १० तासांची होईल. मनुष्य १९१ वर्षे जगेल. कोणालाही कोणत्याही प्रकारचा रोग होणार नाहीं.” माग एक अंशीच एक पत्रिका चोहोंकडे पसरली होती परंतु तिचा प्रत्यय आल्याचें आह्मांस स्मरत नाहीं.

नवीन गव्हरनर जनरल येत्या सप्तेंबर महिन्यांत हिंदुस्थानांत येण्या साठीं निघतील.

लांडगे नदी कशी उतरतात!—सगळ्यांत पुढच्याचें ह्मणजे पहिल्याचें शेंपूट दुसऱ्यानें आपलें तोंडांत धरावें, दुसऱ्याचें तिसऱ्यानें धरावें आणि तिसऱ्याचें चवथ्यानें धरावें अशा प्रकारें माल करून पोंहून जाऊन लांडगे नदी उतरतात. ग्रीक लोक अशा जारा लांडग्यांच्या वाटोळ्या माळेचें सादृश्य, वर्षास देत असत. त्यांच्या भाषेंत त्यास लिक्याबस हा शब्द आहे. लिक्याबस ह्याचा अर्थ लांडग्यांची स्वारी.

गोवर्धनदास नामक एक मनुष्य अलहाबादेस वकील व बारिस्टर यांची दलाली करून आपला उदर निर्वाह करीत असे. हा रोजगार त्यानें कित्येक वर्षें पर्यंत चालविला होता. परंतु तो थोड्या दिवसांपूर्वीं उघडकीस येऊन त्याजवर अलहाबादेचे माजिस्ट्रेटानें फौजदारी काम चालवून त्यास ६ महिन्यांच्या सक्त मजुरीची शिक्षा दिली. सकृद्दर्शनीं ही शिक्षा फार कडक झाली, असें वाटेल, परंतु ह्या दलालीच्या रोजगारा पासून पक्षकार लोकांची जो हानि होते, तिचा विचार केला असतां व उघडकीस आलेल्या अपराध्यास कडक शिक्षा केल्यानें हा धंदा करण्याचें लोक सोडून देतील असा विचार मनांत आणला ह्मणजे झालेली शिक्षा योग्य आहे असें वाटेल. ज्या अर्थीं दलालीचा धंदा चालण्यास वकील व बारिस्टर कांहीं अंशीं कारण होतात, त्या अर्थीं त्यांनीं दलालास दलाली देण्याचें अगदीं बंद केल्या शिवाय हा अन्यायाचा धंदा अगदीं बंद व्हावयाचा नाहीं. ज्या ठिकाणीं वकील पुष्कळ आहेत तेथें प्रथमच वकिलीचे काम आरंभ करणाऱ्या वकिलांस दलालाचें सहाय घेणें अवश्य वाटत असेल, परंतु आपल्या योग्यतेच्या जोरावर नव्हे तर अशा अन्यायाच्या मार्गाचा अवलंब करून द्रव्यो पार्जन करणें हा नीच मार्ग आहे. ह्या साठीं जे कोणी वकील दलालीची मदत घेत असतील त्यांनीं तसें करूं नये अशी आह्मी त्यांस शिफारस करितों.

इंग्रजी पांचव्या व मराठी सहाव्या इयत्तेच्या परीक्षेंतून भूमिती व बिजगणीत हे विषय काढले. मराठी सहावे इयत्तेस कविता ही त्या त्याही कमी केल्या.

मद्रास इलाख्यांत १८९० त खानेसुमारी होणार. न्या० सिं०

पोस्टाच्या कार्डी झांकून पाठवितां येण्यासारखी कांहीं नवीन योजना काढण्यांत इंग्लंडचे पोष्टमास्तर जनरल गुंतले आहेत.

आरोग्याच्या तजविजी करण्या करितां म्युनिसिपालिट्यांस लागेल तें कर्ज कमी व्याजानें द्यावें असें बंगाल सरकारनें ठरविलें आहे. क. त.

---

नोटीस.

सावकार नथमल खेमराज मारवाडी दुकान शेगांव ताळुके खामगांव जिल्हे अकोलें यांस खालीं सही करणार याज कडून नोटीस देण्यांत येते कीं, माझें टाकळी नागझरी ताळुके मजकूर येथील शेत सरवे नंबर ५२ एकर ११ गुंठे ०३४ हें आपले पाशीं ऐंशी ८० रुपयास तारीख २८ माहे मे सन १८८१ इसवी रोजीं अगर ह्या सुमारास ताबेगहाण लिहून दिलें असून सदरहुचा ताबा वहाणें करितां आपलें पासून राजिस्टर करून परत घेतला असतां तें शेत आपण जबरदस्तीनें दुसऱ्यास आज दोन २ वर्षें लावून त्यांतील उत्पन्न परभारें नेलें त्या मालाचा जमाखर्च व विक्री माझे समक्ष होणें ती मी गावीं असतां माल माझे अपरोक्ष नेऊन विकला हे कायद्याचे विरुद्ध केलें याजबद्दल जबाबदार आपण आहात. आपण केवळ पैशाचे मालक आहा. असो आपले देणें पेक्षां शेताचे दोन वर्षांचें उत्पन्नाची पोंच ज्यास्त झाली आहे करितां आपलें देणें कांहीं राहिलें नाहीं. सदरहु शेत मी चालूं सालीं रायासिंग पाटील नागझिरीकर यांस बटाईनें दिलें आहे व त्याचे तर्फे भागीत तुळशिंग पाटील व फत्तु पाटील टाकळीकर यास त्यानें घेतलें आहे सदरहु पोटभागीदार हे आपले देनदार असल्यानें त्याजपासून जोरानें बटाईचा पट्टा लिहून घ्याल घ्याल तर तो रद्द असे. आपलें देणें आपलें मतें निघत असेल तर दिवाणींत फिर्याद करणें, त्याचा जबाब देण्यास मी तयार आहे. सदरहु शेताचा दस्तैवज व जास्त पोंच हीं नोटीस पावल्या पासून १ एक महिन्याचे आंत परत देणें न दिल्यास या नोटीशीसुद्धां खर्च फिर्याद करून घेऊं. कळावें. तारीख २९।७।८८ इ०

( सही )

( सही ) माधव अमृत कुळकर्णी

रहाणार नागझरी

दस्तूर खुद्द.

---


जाहिरात.

पुणें “ ज्ञानचक्षु ” छापखान्यांत विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.

| मराठी आक्ट. | किंमत | ट. ह. |
| --- | --- | --- |
| क्रिमिनल प्रोसिजर सटिक | ५ | ०८ |
| सिव्हिल प्रोसिजर सटीक | ५ | ०८ |
| पिनलकोड सटीक....... | ७ | ०८ |
| न्यायरत्न.......... | २ ०८ | ०२ |
| रेव्हिन्यु कोड.......... | ०८ | ०१ |
| सदरची रुळी,......... | ०८ | ०१ |
| स्टांप आक्ट.......... | ०६ | ०१ |
| कोर्ट फी आक्ट........ | ०६ | ०१ |
| कराराचा आक्ट........ | ०१३ | ०२ |
| पुराव्याचा आक्ट........ | ०८ | ०१ |
| राजिस्टर आक्ट........ | ०६ | ०१ |
| मुदतीचा आक्ट........ | ०६ | ०१ |
| आबकारी आक्ट........ | ०७ | ०१ |
| जंगलसंबंधीं आक्ट........ | ०८ | ०१ |
| विशेष न्यायाचा आक्ट.... | ०८ | ०१ |
| वतनदार आक्ट........... | ०६ | ०१ |
| लोकलबोर्ड आक्ट........ | ०६ | ०१ |
| मनोरंजक पुस्तकें. | किंमत | ट. ह. |
| श्री भावार्थरामायण.... | २० | २ |
| विचित्रपुरी......... | २ | ०२ |
| मदनमंजरी ......... | २ | ०२ |
| कामकंदला नाटक.... | १ | ०२ |
| उपयुक्त चमत्कार सं. भा. १ ते १० दर मागास किं. दहाही भा. वेत. ट. हा. माफ. | ०५ | ०१ |
| अलखमेपलख पलखमे दर्याव | ०४ | ०१ |
| सतारीचें १लें पुस्तक.... | १०४ | ०२ |
| संगीत राधाविलास नाटक. | ०६ | ०१ |
| मदनजन्म नाटक........ | ०१२ | ०२ |
| चमत्कारचिंतामाणि .... | ०१३ | ०२ |
| मल्लविद्याप्रकाश........... | १ | ०२ |
| ऋणसंहार............ | ०४ | ०१ |
| मराठी ह्मणी.......... | ०७ | ०१ |
| गोपीचंद नाटक ( हीं. ) . | ०१२ | ०२ |
| पाटी रघुसर्ग दर भ. | ०१० | ०१ |

भाऊ गोविंद सापकर, ज्ञानचक्षूचे मालक.

---

TO THE DEAF.

A 132 PAGE ILLUSTRATED BOOK ON DEAFNESS NOISES IN THE HEAD HOW CURED AT YOUR HOMES. PRICE 6 ANNAS; ADDRESS DR NICHOLSON, 5, OLD COURT HOUSE STREET CALCUTTA.

बहीरे लोकांस सुचना

बहीरेपणा व डोक्यांत ध्वनी होणें हे आपल्या घरीं कसे बरे होतात याजवर स्पष्ट करणास हे १३२ पानांचे आमचे पुस्तक किंमत ६ आणे. डाक्टर निकलसन ५ ओल्ड कोर्ट हाऊस स्ट्रीट--कलकत्ता या पत्यावर मागवावे.


---

☞ हें पत्र आकोला येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे “ वऱ्हाडसमाचार ” छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.